विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | दिशा |
| संपादक | : | श्री. अचलकुमार टिल्लू |
| प्रकाशक | : | विद्या प्रसारक मंडळ |
| प्रकाशन वर्ष | : | २००१ |
| वर्ष | : | पहिले |
| अंक | : | ४ |
| पृष्ठे | : | ४० पृष्ठे |

**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या "ग्रंथालय" प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१०**

**गणपत्रिका क्रमांक : ४४**


MAHMARI 19358/13/1/2000 - TC

विद्या प्रसारक मंडळ

व्ही. पी. एम्.

# दिशा

वर्ष पहिले / अंक ४ / मार्च २००१



व्ही. पी. एम्.

# दिशा

वर्ष पहिले / अंक ४ / मार्च २००१

**संपादक**
श्री. अचलकुमार टिळू
**कार्यकारी संपादक**
प्रा. मोहन पाठक
**सहसंपादक**
सौ. मंजिरी दांडेकर
**सहाय्यक मंडळ**
सौ. भारती जोशी
सौ. विशाखा देशपांडे
कु. दीपाली भाटकर
**कायदेविषयक सल्लागार**
ॲड. सलील बुटाला

**कार्यालय**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्यामंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
दूरध्वनी : ५४२ ६२ ७०
**मुद्रण स्थळ :**
परफेक्ट प्रिन्टस,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
दूरध्वनी : ५३४ १२ ९१

## अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | | ३ |
| २) | पत्र | भालचंद्र मुणगेकर | ४ |
| ३) | पत्र | विवेक मैत्रा | ५ |
| ४) | भगवद्गीता | सौ. गीता कुलकर्णी | ६ |
| ५) | डॉ. आंबेडकरांच्यावरील चित्रपटाच्या निमित्ताने | डॉ. र. म. शेजवलकर | ७ |
| ६) | गूढयात्री | प्रा. प्रदीप कर्णिक | ११ |
| ७) | तंत्रनिकेतनाच्या ग्रंथालयातील एक महत्त्वाचा संदर्भग्रंथ | सौ. भारती जोशी | १४ |
| ८) | वैभवशाली विजयनगर साम्राज्याची राजधानी-हंपी | सौ. मंजिरी मा. दांडेकर | १६ |
| ९) | 'सहजसाध्य पैशाची हाव'; धनतृष्णा | वेदवती हब्बु | १९ |
| १०) | राष्ट्रीय पुस्तक मेळा | नीता गुंडावार, रविंद्र झनकर अर्चना पुजारी | २२ |
| ११) | बहर ओसरला | सहसंपादक | २५ |
| १२) | एकनाथांची भारुडे | शैला जोगळेकर | २७ |
| १३) | शब्दावाचून अडले सारे... | अजित अ. कुलकर्णी | २९ |
| १४) | स्त्रीला काय हवं असतं ? घर की करिअर? | कु. वर्षा गटणे | ३१ |
| १४) | परिसर वार्ता | सौ. विशाखा देशपांडे | ३४ |

सुविचारांचे संकलन श्री. संतोष मयेकर यांनी केले आहे. - संपादक

सौंदर्य महालात राहतं, तर ज्ञान हे ग्रंथालयात राहते.

# संपादकीय

आपल्या श्वासोच्छवासाला गती आहे, तशीच दिसामासांना आणि ऋतुसंवत्सरानांही गती आहे. संवत्सराचे बारा महिने. पौषाचा संदेश घेऊन माघ येतो. हा अकरावा महिना असला तरी अकराव्या रुद्राप्रमाणे भयंकर नाही की गीतेतल्या अकराव्या अध्यायाप्रमाणे विराट दर्शनही नाही. त्याची प्रकृती सौम्य आहे.

माघात वसंत पचंमी, रथसप्तमी, शिवरात्र हे उत्सव साजरे होतात. त्याच बरोबर गुरु तेगबहादूर, समर्थ रामदास, वासुदेव बळवंत फडके, सयाजीराव गायकवाड, कस्तुरबा गांधी, गोळवलकर गुरुजी, डॉ. होमी भाभा यांचेही स्मरण होते. या नररत्नांनी स्वकर्तृत्वाने एक वेगळाच ठसा उमटवला आहे.

वर्षातला शेवटचा महिना फाल्गुन. बारा महिन्यांच्या नाटकाचे एक आवर्तन फाल्गुनाबरोबर संपत. हे महिने ऋतूंचे प्रतिनिधी. या सृष्टीच्या नाटकात फाल्गुनाची भूमिका दुहेरी. नायकही तोच, विदूषकही तोच. होळीची उष्णता आणि चंद्राची शीतलता एकत्र आणणारा, अर्वाच्य शब्दांनी रात्र जागवणारा फाल्गुन जेव्हा तुकोबांच्या आणि नाथांच्या पुण्यतिथीला हातात टाळ घेऊन भक्तिभावाने भजन करताना दिसतो तेव्हा त्याच्या या विसंगत भूमिका पाहून गंमत वाटते. हाच महिना वसंत ऋतूची देणगी नव्या वर्षाला वहाल करतो.

फाल्गुनातील महत्त्वाचा सण होलिकोत्सव. खरे तर वाईट, अमंगळ ते दहन करण्याचा हा दिवस पण याला हल्ली बीभत्स स्वरूप आलेले दिसते. वर्षभर मोठ्या प्रयासानं दडपून ठेवलेल्या हीन अभिरुचींचा उद्रेक या दिवशी जाणवतो. आपल्या भारतीय संस्कृतीत अग्नीला महत्त्वाचं स्थान आहे. अथर्ववेदातील पृथ्वीसूक्त गाणारे ऋषी म्हणतात, 'या भूतलावर सर्व ठिकाणी अग्नी व्याप्त आहे. तो औषधी वनस्पतीत आहे. सागरातही वडवानल आहे. प्रचंड पर्वतांच्या पोटात ज्वालामुखीच्या रुपाने अग्नीच आहे.' भूचर, खेचर आणि जलचरांच्या शरीरात जठरानलही अग्नीच आहे. अग्नीच हे रूप उत्तरोत्तर अधिकाधिक उपकारक अशा उदात्त स्वरुपात विकसित झालेले दिसते. पण आपण मात्र होळीच्या नावाखाली जंगलतोड करून पर्यावरणालाच 'अग्नेय स्वाहा' करत आहोत. पर्यावरणाचे संरक्षण म्हणजेच आपले संरक्षण हे लक्षात ठेवायला हवे. होलिकोत्सवाच्या निमित्ताने आपल्याकडून कळत नकळत गैर कृत्य होणार नाही या साठी जागे राहिले पाहिजे !

संपादकीय लिहून संपवताना नाट्य अभिनेत्री भक्ति बर्वे व क्रिकेटचे शहेनशाह डॉन ब्रॅडमन काळाच्या पडद्याआड गेल्याचे वृत्त आहे. दिशा परिवारातर्फे त्यांना विनम्र श्रद्धांजली.

संपादक

डॉ. भालचंद्र ल. मुणगेकर
[illegible]

मुंबई विद्यापीठ
फोर्ट, मुंबई - ४०० ०३२.

क्र.कुलगुरू/५७३१

२२ जानेवारी, २००१

श्री. टिल्लू यास,

विद्या प्रसारक मंडळाच्या बांदोडकर महाविद्यालयात दिनांक ९ ऑगस्ट रोजी झालेल्या सत्कार समारंभ प्रसंगी मी केलेले भाषण असलेल्या दिशा या मासिकाची पाठविलेली प्रत मिळाली. आठवणीने प्रत पाठविल्याबद्दल मी आपला आभारी आहे.

आपला,

(भालचंद्र मुणगेकर)

श्री. अचलकुमार टिल्लू,
कार्यकारी संपादक, "दिशा",
विद्या प्रसारक मंडळ,
डॉ. बेडेकर विद्या मंदिर,
नौपाडा, ठाणे ४०० ६०२.

D.O. No.2.11./2001/MPA&IT

अतिरिक्त निजी सचिव
संसदीय कार्य एवं
सूचना प्रौद्योगिकी मंत्री
भारत
नई दिल्ली-110001
ADDITIONAL PRIVATE SECRETARY TO
MINISTER OF PARLIAMENTARY AFFAIRS
AND INFORMATION TECHNOLOGY
INDIA
NEW DELHI-110001

25 जनवरी 2001

आदरणीय श्री अचलकुमार टिल्लू,

आपल्या संस्थेच्या ऑक्टोबर 2000 ला झालेल्या कार्यक्रमावेळी मंत्री महोदयांच्या भाषणाचा आपल्या ' दिशा ' अंकात समावेश करून सर्वांपुढे ठेवण्याबाबत आपले मंत्री महोदयांना संबोधून लिहलेले निवेदन या कार्यालयास प्राप्त झाले. आपला अभिप्राय मंत्री महोदयांच्या निदर्शनास आणला. मंत्री महोदयांनी आभार व्यक्त केले आहे.

सदिच्छांसह,

आपला

(विवेक मैत्र)

श्री. अचलकुमार टिल्लू,
कार्यकारी संपादक, ' दिशा '
विद्या प्रसारक मंडळ,
डॉ. बेडेकर विद्या मंदिर,
नौपाडा,
ठाणे-400 602.

# भगवद्गीता

*भगवद्गीता ! एक चिरंतन ग्रंथ. एक चिरंतन विषय. या विषयावर अनेक अंगांनी विचार करता येतो. प्रत्येक व्यक्तीचे मत सापेक्ष असते. असाच एक लेख - संपादक*

श्रीमद्-भगवद्गीतेबद्दल लिहिणे ही अत्यंत आनंददायी गोष्ट आहे. कारण त्यातील कर्मयोग, ज्ञानयोग व भक्तियोग हे त्रिकालाबाधित सत्यच राहणार आहे. आपल्याला सर्वांनाच माहीत आहे की गीता ही अर्जुनाला श्रीकृष्णाने कुरूक्षेत्रावर सांगितली. तेथे अर्जुनाने अनेक प्रश्न विचारले व त्याची उत्तरे श्रीकृष्णाने तेथल्या तेथेच दिली आहेत. त्यातूनच आपल्या सर्वांना आपल्याही जीवनाशी निगडीत असलेल्या प्रश्नांची उत्तरे सहज सापडतात. उदाहरणार्थ - युद्धामध्ये अर्जुनाचे अनेक आप्त-बांधव, गुरूजन, मित्र उभे आहेत, त्यांना मारायचे की नाही, त्यामुळे वंशाचा नाश होईल का? त्यांना मारल्यावर आपण कोणावर राज्य करणार? हे राज्यच नको. वगैरे - हे प्रश्न जरी बरोबर असले तरी अर्जुन त्याचा जो स्वधर्म म्हणजेच क्षत्रियधर्म विसरू पाहात होता व अयोग्य वेळेला हे सर्व आठवत होता. आपणही कित्येक वेळा आपल्या स्वधर्माला उचित काय आहे व आपला स्वधर्म काय आहे हे माहीत असताना अशा अनेक पळवाटा काढत असतो व आपलेच प्रश्न वाढवीत असतो व दुःखी होतो.

गीतेतील श्रीकृष्ण आपल्याला अर्जुनाच्या द्वारे आपले स्वहित, स्वधर्म, स्वकर्म व स्वज्ञानाचेच दर्शन घडवितो. गीतेचा कुठलाही अध्याय वाचला व त्यातील कुठलाही श्लोक वाचला तरी त्यातून आपल्याला कर्ममार्ग तरी कळेल नाहीतर भक्तिमार्ग. गीता आपल्याला मान-अपमान, निंदा-स्तुती, सुख-दुःख या द्वंद्वांच्या पलिकडे जाण्यास सांगते व कसे जायचे ह्याचा मार्गही दाखविते व त्या द्वंद्वाच्या पलिकडे का जायचे हेही सांगते.

उदा. अध्याय १२ वा, श्लोक १८ -१९;
अध्याय १३ वा, श्लोक ९ व २८;
अध्याय १६ वा, श्लोक १८ व २१;
अध्याय १८ वा, श्लोक ४५ व ४७.

गीतेचा अभ्यास हा कधीच न संपणारा व दररोज नवीन अर्थ प्राप्त करून देणारा आहे. त्यामुळेच त्याची जवळ जवळ सर्व भाषांत भाषांतरे झालेली आहेत व पाश्चिमात्य देशातही जर्मन, फ्रेंच व इंग्रजीत भाषांतरे आहेत. गीता ही छंदमय आहे, काव्यमय आहे. त्यात गेयता आहे. त्यामुळे आपल्याकडील लहान-थोर, स्त्री-पुरुष या सर्वांनी एकतरी अध्याय दररोज म्हटला तर मन बदलण्यास निश्चितच मदत होईल. गीतेबद्दल लिहावे तितके थोडेच आहे.

अर्जुनाला जसे श्रीकृष्णाने स्वधर्मास प्रवृत्त केले, त्याचा संदेह घालवला, मोह घालवला व स्मृती जी आप्तेष्टांमध्ये अडकली होती तिला मार्गावर आणली; तसेच आपल्याही जीवनातील संदेह, मोह गीता घालवेल व आपल्या जीवनाला निश्चितच एक योग्य दिशा व वळण लागेल याबद्दल तिळमात्रही शंका नाही. आपणही अर्जुनासारखे श्रीकृष्णाचे भक्त व मित्र होण्याचा प्रयत्न या गीतेद्वारे करून श्रीकृष्णाचा आशीर्वाद घेऊ.

**सौ. गीता कुलकर्णी**
अ-३०६, मिस्त्री अपार्टमेंटस्,
वेस्टर्न एक्सप्रेस हायवे जवळ,
अंधेरी (पूर्व), मुंबई-४०००६९.

* * *

# डॉ. आंबेडकरांच्यावरील चित्रपटाच्या निमित्ताने -

*डॉ. आंबेडकर! अतिशय वेगळा चिंतन विषय. आंबेडकरांच्या जीवनावर आलेल्या नितांत सुंदर चित्रपटाचा अनुभव प्रसिद्ध लेखक डॉ. र. म. शेजवलकर यांनी शब्दबद्ध केला आहे. - संपादक*

नेहमीच्या हिंदी मराठी चित्रपटांमधील त्याच त्याच गोष्टींचा म्हणजे सूड, बदला, हाणामारी, जुळ्या भावांच्या फसगतीच्या कथा, त्याच त्याच गुलगुलीत प्रेमकथा, मनसोक्त अंगप्रदर्शन, कानठळ्या बसविणारे संगीत या सर्वांचाच मला विलक्षण कंटाळा आलेला, बाहेर अवेळी पावसाने आणलेली सुस्ती, दूरदर्शनच्या सर्व चॅनेल्सवर वर्षाखेरीच्या कार्यक्रमांचा धुमाकूळ, या अशा पार्श्वभूमीवर मी 'डॉ. आंबेडकर' हा जब्बार पटेल यांचा चित्रपट पहायला गेलो. रविवारची संध्याकाळ म्हटल्यावर थिएटरबाहेर भरपूर गर्दी पाहण्याची सवय. पण या चित्रपटाच्या रविवारच्या खेळालाही थिएटरवर काही पाचपंचवीस माणसे पाहून थोडा दचकलोही... चित्रपट मोठा असल्याने वेळेवर सुरु झाला... आणि पुढचे तीन तास एका विलक्षण आनंदात सार्थकी लागल्याचे समाधान मिळाले - डॉ. आंबेडकरांचे चरित्र, किमान त्यांच्यावरलची ढोबळ माहिती तशी सर्वांनाच असल्यामुळे कथानकात फारसे उत्कंठावर्धक, नावीन्यपूर्ण काही वाटत नसतानाही तीन तास फक्त मलाच नाही, तर जेमतेम अर्ध्या भरलेल्या थिएटरमधील एकूण एक प्रेक्षकांना भुताटकी झाल्यासारखे खिळवून ठेवले - चित्रपट संपेपर्यंत थिएटरमध्ये एक विलक्षण सन्नाटा पसरलेला - कुठेही प्रेक्षकांचा विरस करणारे वेफर्सचे कुरकुरण्याचे आवाज नाहीत, अस्थानी हशा पिकविणाऱ्या कॉमेंटस् नाहीत, लहान मुलांच्या रडण्या ओरडण्याचे आवाज नाहीत, मध्यंतर झाल्यावर उठण्याचे भान नाही, चित्रपट संपल्यावर किंवा संपता संपता बाहेर पडण्याची घाई नाही - सगळं कसं सुन्न सुन्न करणारं - चित्रपट संपल्यावर प्रेक्षक पावले ओढल्यागत बाहेर पडत होते- माझी नजर आता प्रेक्षकांच्या प्रतिक्रियांकडे वळली - पण कुणीही एक चकार शब्द बोलत नव्हते - नाही म्हणायला एक मध्यमवयीन स्त्रीप्रेक्षक मुक्तपणे हुंदके देत रडत पुढे सरकत होती - सोबत पतीही होता पण तो सुद्धा तिची समजूत वगैरे काढण्याच्या फंदात पडत नव्हता, त्या रडणाऱ्या स्त्रीला आपल्या रडण्याची लाज, संकोच वाटत नव्हता आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे इतर आजूबाजूच्या प्रेक्षकांनाही त्या रडण्याचे आश्चर्य वाटत नव्हते - कारण त्या स्त्रीप्रेक्षकात आणि अनेक इतर प्रेक्षकात फक्त किरकोळ फरक होता, सर्वांनाच रडावेसे वाटत होते - फक्त सभ्यतेचे सामाजिक निकष त्यांना ते रडणे जाहीर करू देत नव्हते. ती स्त्रीप्रेक्षक मात्र त्या चित्रपटावरचा अभिप्राय या पद्धतीने जाहीरपणे व्यक्त करीत होती... एवढ्या भयानक गंभीर वातावरणात सुन्न करणारा असा हा माझा पहिलाच अनुभव होता...

असे सुन्न करणारे या चित्रपटात आहे तरी काय? मी नंतर शांतपणे विचार करू लागलो तेव्हा एकेक गोष्टी समजू लागल्या. समाजातील अस्पृश्यांवरील अन्यायाने चवताळून उठलेल्या, सर्वांनाच माहिती असलेल्या एका महानायकाची ही जीवनगाथा... अनेक महत्त्वाचे तेवढेच घटनाप्रसंग घेऊन विलक्षण वेगाने कथानक पुढे सरकते... प्रत्येक घटनाप्रसंग जास्तीत जास्त दीड ते दोन मिनिटांचा, काही तर त्यापेक्षाही कमी वेळाचे, हा वेग प्रेक्षकांना खुर्चीत खिळवून ठेवतो... त्यात लहान लहान फ्लॅशबॅक्स कथानकाच्या ओघात आल्यासारखे वाटणारे - प्रत्येक

घटनाप्रसंग त्या त्या काळातील सर्व तपशील बिनचूक वापरत शक्य तेवढा निर्दोष करण्याचा प्रयत्न... चित्रपट माध्यमाला, दिग्दर्शकाला आणि सर्वच तंत्रज्ञांना आव्हान देणारे असे कथानक.. प्रत्येकाने त्यात आपला जीव ओतलेला... प्रमुख नटापासून मॉब सीनमधल्या प्रत्येक कलावंताने समर्पित भावनेने कॅमेरासमोर झोकून दिलेले... संपूर्ण चित्रपटात रूढार्थाने कलावंतांच्या तोंडी गाणे नाही - कबीराचा एक दोहा आणि गोंधळाचे एक लोकगीत... पण तेथेही कालानुरूप आवश्यक तेवढाच त्याचा संदर्भापुरता वापर... कॅमेरा तर सतत पायाला भिंगरी आणि पाठीला पंख लावल्यासारखा... सतत अस्वस्थ असलेल्या कथानायकाशी पूर्णपणे सुसंगत! पात्रांमधले संवाद प्रत्येक शब्द न शब्द मोजून मापून बोलण्याइतकेच, त्याचबरोबर अचूक संदर्भांची भर घालीत कथानक पुढे नेणारे... रिलीफसाठी कॉमेडीचा हास्यास्पद वापर कटाक्षाने टाळलेला - कथानायकाचे मोठेपण सांगण्यासाठी मुद्दामहून कुणातरी दुसऱ्याला खालच्या पातळीवर आणणे नाही की निष्कारण विवादास्पद गोष्टींचे भांडवल करणे नाही... घटनास्थळे तर क्षणाक्षणाला देशातून परदेशात, इतक्या अंतराने बदलणारी.. पण कुठेही तपशीलावरची पकड न सोडता... एका अर्ध्या मिनिटाच्या प्रवेशासाठी, आताच्या पिढीला माहिती नसलेली ट्रामसुद्धा वापरलेली... केशभूषा, वेशभूषा, आजूबाजूची प्रत्येक वस्तू त्या त्या काळाच्या संदर्भानुसार पारखून घेतलेली... आणि हा सर्व आवेशानिशी प्रत्येक प्रसंग प्रेक्षकांच्या अंगावर येणारा... सर्वच एकूण सुन्न करून टाकणारे, इतके की आपण निश्चित सुन्न कशामुळे झालोय हे ही प्रेक्षकांच्या लक्षात येऊ नये. असे टीमवर्क असलेला हा चित्रपट... एका महानायकाचे कौटुंबिक, सामाजिक, राजकीय अशा सर्व पातळ्यांवरील शक्य तितके तपशील देणारे विलक्षण वेगवान चित्रण...

काही वर्षांपूर्वीच महात्मा गांधींवरचा रिचर्ड ॲटन बरोचा 'गांधी' चित्रपट भारतीय चित्रपटसृष्टीला आव्हान देऊन गेला... आपल्याच राष्ट्रातील एका महान व्यक्तिमत्त्वावरचा चित्रपट परदेशी चित्रपट व्यावसायिकाने यशस्वी करून दाखवावा हा सल प्रत्येकाच्या मनात कुठेतरी असणार... तुलना करणे कठीण आहे कारण 'गांधी' आणि 'आंबेडकर' ही व्यक्तिमत्त्वेच मुळी टोकाच्या वैचारिक पातळीवरची. पण 'गांधींच्या' तुलनेत 'आंबेडकरांवरचा' हा चित्रपट मला कुठेही कमी वाटला नाही.. आंबेडकरांच्या या चित्रपटाने मला एवढं भारावून कशामुळे टाकलं?

आणखी शांतपणे विचार करू लागलो, तेव्हा आणखी काही वेगळ्या गोष्टी लक्षात येऊ लागल्या... चित्रपटामधल्या दिग्दर्शन, अभिनय, संवाद लेखन, छायाचित्रण इ. सर्व तांत्रिक गोष्टींबरोबरच सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे कथानायक आणि त्याचे एकूण व्यक्तिमत्त्व, कार्य हे इतर कुणाही तत्कालिन नेत्यांपेक्षा काहीतरी वेगळ्या पातळीवरचे आहे... मग पुन्हा शोध सुरु झाला... हे नक्की कोणत्या वेगळ्या प्रकारचे आहे याचा... कारण त्या वेळचे बहुतेक अग्रगण्य नेते सुशिक्षित होते, त्यात बॅरिस्टर असलेलेही बहुसंख्य, त्यामुळे वैचारिक पातळीचा प्रश्न नव्हता... किमान बौद्धिक क्षमता अशा सर्वांकडेच होती... त्यांचे विचार वादग्रस्त असतील पण विचार करण्याची कुवत सर्वसामान्य माणसांपेक्षा निश्चितच जास्त होती... समाजातील बहिष्कृत, पीडीत शोषित वर्गाबद्दलचा कळवळाही सर्वांना होता, सर्वांचे देशप्रेमही वादातीत होते... सर्व नेते अत्यंत प्रतिकूल परिस्थितीशी सामना देत जगले होते - मग या सर्वांच्यामधून मला डॉ. आंबेडकरांचे व्यक्तिमत्त्व वेगळे कशाला वाटले - ? बराच विचार केल्यावर लक्षात आले ते इतकेच की चित्रपटाएवढेच मला कथानायकाच्या दोन वैशिष्ट्यपूर्ण गोष्टींनी वेगळा विचार करायला लावला होता

पहिली गोष्ट म्हणजे डॉ. आंबेडकरांची सडेतोड निरुत्तर करणारी विद्रोही भूमिका... आपल्या बांधवांवरील

अत्याचार पाहिल्यावर, एकूण हिंदूधर्माची भूमिका लक्षात घेतल्यावर सरतेशेवटी 'जो हिंदू धर्म माझ्या बांधवांना, मला, साधा माणुसकीचा आधार द्यायला तयार नाही तो धर्म माझा नाही' या निष्कर्षाला येऊन हिंदू धर्माचा त्याग करून बौद्ध धर्म जाहीरपणे स्वीकारण्याची त्यांची कृती... ही धमक आणि धडाडी त्यांच्या समकालीन राष्ट्रपुरुषांमध्ये फारशी कुठे दिसून येत नाही. लोकानुनय करूनही समाजसुधारणा करणारे बहुसंख्य समाजसुधारक त्यावेळी होते - समाजाला डिवचण्याची किंवा रुढीपरंपरेच्या मुळावरच घाव घालण्याची कृती फारशी कुणाला मानवली नाही - डॉ.आंबेडकरांनी मात्र ही कृती केली - मनुस्मृतीचे जाहीर दहन, बौद्ध धर्माचा स्वीकार, चवदार तळ्याचा सत्याग्रह अशा अनेक धक्कादायक कृतींनी त्यांनी आपले विचार स्पष्ट केले - ही धमक, धडाडी हा त्यांच्या व्यक्तिमत्त्वातला वेगळा पैलू - शाब्दिक, तात्त्विक कोलांट्या उड्या बाजूला ठेवून समाजपुरुषाला खडबडून जागे करण्याची त्यांची ही धडक कृती, तीही माणुसकीच्या मुलभूत हक्कासाठी... मला या नेत्यावद्दल वेगळा विचार करायला भाग पडते

दुसरी त्यांच्या व्यक्तिमत्त्वातली महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्यांचे पुस्तकांवरचे अमर्याद प्रेम... खरं तर त्यावेळचे बहुतेक समकालीन पुढारी, नेते विद्वान होते, त्यांनाही शिक्षणाचे महत्त्व कळत होते पण डॉ. आंबेडकरांएवढा पुस्तकवेडा नेता मला दुसरा कुणी आढळत नाही. प्रसारमाध्यमांची सोय नसल्याने ज्ञानाचे सर्व दरवाजे पुस्तके उघडूनच मोकळे होतील हे जाणून घेऊन डॉ. आंबेडकरांनी माणसांआधी पुस्तकांना जवळ केले - त्यांच्या पुस्तक प्रेमाच्या आणि वेडाच्या अनेक गोष्टी ऐकिवात आहेत त्यातल्या दोन आठवणी वेगळ्या वाटतात त्या सांगण्याचा मोह आवरत नाही... डॉ. आंबेडकरांना एकदा व्हायोलिन शिकावेसे वाटले... कोणतीही नवीन गोष्ट शिकायची म्हटली की त्यांची त्या विषयावरच्या पुस्तकांची शोधाशोध सुरु होई त्यानुसार त्यांनी व्हायोलिन शिक्षकांना विचारले - या विषयावर प्राथमिक माहिती आधी मी मिळवतो मग आपण व्हायोलिन शिकवणी सुरु करू... या विषयावर कुणी पुस्तक लिहिले आहे का? त्यांच्या त्या व्हायोलिन शिक्षकाने एक जुने पुस्तक त्यांना दिले... ते चाळून शिक्षकांना म्हटले, 'अहो, हे पुस्तक तीस वर्षांपूर्वीचे आहे... मधल्या काळात आणखीही काही माहिती या पुस्तकाच्या नव्या आवृत्तीत दिली असेल, ती बघायला पाहिजे...' एवढे म्हणून आंबेडकर थांबले नाहीत तर त्यांनी त्या पुस्तकाच्या लंडनमधल्या मूळ प्रकाशकाला तार (टेलिग्राम) करून, नवी आवृत्ती मागवून घेतली - आधी ते व्हायोलिनचे पुस्तक अभ्यासले... व्हायोलिनबद्दल पुस्तकातून आवश्यक माहिती मिळविली आणि मगच व्हायोलिनची शिकवणी पुढे चालू झाली.

त्यांच्या पुस्तकवेडाची आणखी एक गोष्ट खुद्द एका ग्रंथपालानेच एका दिवाळी अंकात दिली आहे; डॉ.आंबेडकरांनी ज्ञानाचे महत्त्व ओळखून आपल्या बांधवांसाठी, ज्ञानाचे दरवाजे उघडून देणारे सिद्धार्थ कॉलेज स्थापन केले त्यावेळची ही कथा.. आपल्या कॉलेजमधल्या यथायोग्य ज्ञानदान चोखपणे करू शकणारे शिक्षक, प्राध्यापक त्यांनी त्यासाठी शोधून शोधून जमविले यात फार विशेष म्हणता येण्यासारखे नाही, ती मूलभूत गरजच होती, पण त्यापेक्षाही महत्त्वाची मूलभूत गरज होती ती त्यांच्यासारख्याच एखाद्या पुस्तकवेड्या ग्रंथपालाची... तसा ग्रंथपालही त्यांनी शोधून काढला आणि त्याला सन्मानाने आपल्या कॉलेजमध्ये वरच्या जागेवर बढती देऊन नेमले... ह्या ग्रंथपालाला त्यांनी सांगितले, तुम्हाला आवडतील ती कोणतीही पुस्तके आपल्या कॉलेजसाठी खरेदी करा - बिले कॉलेजच्या नावावर करून पाहिजेत ती पुस्तके ग्रंथालयात जमा करा... तुम्हाला त्यासंदर्भात कोणतीही आडकाठी नाही, कुणाच्याही परवानगीची जरुरी नाही... तो ग्रंथपालही आंबेडकरांएवढाच पुस्तकवेडा...

त्याने वर्षभर पुस्तकांची वेगवेगळी दुकाने पालथी घालून आपल्याला आवडतील ती, कॉलेजच्या ग्रंथालयाला उपयोगी पडणारी पुस्तके धडाक्याने जमवायला सुरुवात केली - बिले कॉलेजच्या नावावर जाऊ लागली. वर्षअखेरीस त्या कॉलेजमधल्या एका ज्येष्ठ प्राध्यापकाने त्यांना केबिनमध्ये बोलावून, त्यांची थोडी कानउघाडणी केल्याच्या थाटात त्यांना जाब विचारला. कारण पुस्तकांसाठी मंजूर केलेल्या वर्षभराच्या खर्चापेक्षा काही हजार रुपयांपेक्षा जास्त खर्च त्यांच्या खरेदीमुळे झाला होता... हा जास्तीचा खर्च वार्षिक सभेत मंजूर होणे कठिण होते आणि तसा तो मंजूर झाला नाही, तर ठरलेल्या अंदाजपत्रकापेक्षा जास्त खर्च त्या ग्रंथपालाच्या पगारातून दरमहा कापून घेतला जाणार होता... हे कळल्यावर मात्र त्या पुस्तकवेड्या ग्रंथपालाचे धाबे दणाणले... काय करावे हे काही सुचेना- पुस्तकांच्या वेडाच्या नादात हे अंदाजपत्राचे नियम वगैरे समजून घेण्याचे राहूनच गेले होते. पुन्हा यात कोणताही स्वार्थ नव्हता पण तरीही हे पुस्तकप्रेम नाही म्हटले तरी महागातच पडणार होते... ग्रंथपाल हताश झाले... ठरल्याप्रमाणे वार्षिकसभा झाली. त्यावेळी त्या ग्रंथपालांना जास्तीच्या खर्चाच्या स्पष्टीकरणासाठी मुद्दाम त्या सभेला बोलावले होते. इतर विषय सभेपुढे येऊन गेले आणि पुस्तकांवरच्या खर्चाचा मुद्दा सभेपुढे आला... कार्यवाहांनी त्या वर्षीचे बजेट कितीचे होते, खरेदी किती झाली, ठरल्यापेक्षा किती हजार रुपये यासाठी जास्त खर्च केले गेले याचे वर्णन केले आणि या खर्चाची वसूली कशी करायची, यावरल सभेपुढे प्रश्न मांडला... संचालकमंडळाच्या खुर्चीतल्या डॉ. आंबेडकरांनी तात्काळ सांगितले, खर्च मंजूर - पुढचा विषय बोला... कार्यवाहांनी पुन्हा एकदा या घटनेचे गांभीर्य लक्षात यावे म्हणून ती घटना सर्वांना सांगायला सुरुवात केली, त्यांना थांबवत डॉ. आंबेडकरांनी पुन्हा एकदा ठाम आवाजात सांगितले... खर्च मंजूर - पुढचा विषय बोला... कॉलेजच्या कार्यकारिणीतल्या सर्व सभासदांना त्यांचे ऐकावेच लागले... ग्रंथपालाचा जीव भांड्यात पडला...

महात्मा गांधींच्या निधनानंतर मर्ढेकरांनी त्यांच्यावर लिहिलेल्या कवितेतल्या शेवटल्या चार ओळी अशा आहेत...

'अशीच जावोत काही वर्षे
आणि महात्मा यावा पुढचा
आग्रहास आम्ही पुन्हा पहावे
काढुनी चष्मा डोळ्यावरचा...

डॉ. आंबेडकरांच्या बाबतीत ओळीमधला आशय जसाच्या तसा खरा असूनही, या ओळी त्यांच्या निधनानंतर त्यांच्याबाबतीत म्हणता येत नाहीत... कारण व्यक्तिपूजेच्या संदर्भात त्यांना 'महात्मा' या शब्दाचा विलक्षण तिटकारा होता...

तेव्हा त्यांना, त्यांच्या कार्याला श्रद्धांजली तरी कशी वाहायची? ... 'एखाद्या पुस्तकाचे पान उघडून!' - असं मला वाटतं! तुम्हाला?

**डॉ. र. म. शेजवलकर**
१०४, वर्धमान टॉवर्स, भास्कर कॉलनी,
म. गांधीपथ, नौपाडा, ठाणे - ४००६०२.

* * *

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी विद्या प्रसारक मंडळ तसेच संपादक सहमत असतीलच असे नाही.

# गूढयात्री

*गूढयात्री या कादंबरी बद्दलचा विचार करणारा हा वेगळा अनुभव - संपादक*



जी.ए. गेल्यानंतर अनेक प्रकारची पुस्तकं, लेख प्रसिद्ध झाले. त्यातून किंचित स्वरुपाचे जी.ए. उमटले. पण पूर्णार्थाने ते उमटणं शक्यच नव्हतं. कारण जी.ए. स्वत:च एक चोखंदळ आयुष्य जगले. मोजकेच स्नेही, मोजकाच प्रवास, मोजका परिचय आणि स्वत:विषयी अत्यंत कमी कळू देणारा असा साहित्यिक होता. त्यामुळे ते चरित्ररूपाने वाचकांना मिळतील अशी शक्यता फारच कमी आहे. ते सापडू शकतात ते त्यांच्या प्रचंड पत्रव्यवहारातूनच. पण तो पत्रव्यवहार तरी कसा? तर तो बहुतांशी अत्यंत निखळ असा वाङ्मयीनच. वाङ्मयेतर खाजगी भाग त्यामध्ये फारच अल्प येत असल्याने त्यातूनही जी.ए. मिळणं जवळ जवळ दुरापास्तच ! या पार्श्वभूमीवर जी.एं.च्या जीवनावर एक कादंबरी जी.एं.च्याच एका जवळच्या स्नेही विद्या सप्रे-चौधरी लिहीत आहेत असं जेव्हा समजलं तेव्हा त्याविषयी अत्यंतच ओढ लागली. यातून तरी जी.ए. हाती लागतील काय? किती लागतील? अशा शंका मनात घर करत असतानाच बेळगावच्या 'तरुणभारत'च्या रविवारच्या पुरवणीतून कादंबरीची काही प्रकरणं क्रमश: प्रसिद्ध झाली आणि त्यावर उलटसुलट चर्चा झडायला लागली. जेव्हा कादंबरी हातात आली आणि मोठ्या कुतुहलाने वाचावयाला घेतली तसतशी ही कादंबरी अत्यंत निराशा करीत गेली. 'प्रचंड कंटाळवाणी कादंबरी' असंच त्याचं वर्णन मनामध्ये तयार होत गेलं व शेवटी 'अत्यत सामान्य कादंबरी' असा शेरा मारून ते पुस्तक पूर्ण केलं.

प्रेमभंग ही घटना जी.एं. च्या आयुष्यात अत्यंत महत्त्वाची घटना ठरली आणि त्यांच्या आयुष्याला निर्णायक कलाटणी मिळाली व ते पूर्णपणे नियतीवादी झाले, एकाकी जीवनाची त्यांनी साथ धरली. जी.एं.च्या प्रेयसीशी लेखिकेचा जवळचा संबंध आला होता. त्या घटनेला तीच काय ती एकमेव साक्षीदार होती. म्हणून जी.एं.च्यातला 'प्रियकरावर परिचयझोत सोडून या अनोखी रूपाची ओळख त्यांच्यावर ममता करणाऱ्या असंख्य रसिकांना का करून देऊ नये?' असे वाटल्याने विद्या सप्रे-चौधरी यांनी कादंबरी लिहावयास घेतली व पूर्ण केली. या हेतूबरोबरच 'सरांच्या आणि माझ्या मानलेल्या या बहिणीच्या आयुष्यात घडलेली ती दु:खद घटना बहुधा कुणालाच संपूर्णपणे ज्ञात नाही. या दोघांची विलक्षण कहाणी सांगून जी.एं.च्या गूढ व्यक्तिमत्त्वाचं रहस्य भेदण्यास आपण मदत करावी आणि एक प्रकारे दोघांनाही न्याय मिळवून द्यावा' अशी तीव्र इच्छा लेखिकेला झाली व हा दुसरा हेतूही साध्य करण्यासाठी तिने कादंबरी लिहिण्याचा चंग बांधला. पण वाचक जेव्हा हे हेतू डोळ्यासमोर ठेवून ही कादंबरी वाचीत जातो तेव्हा त्याला प्रा. म. द. हातकणंगलेकरांची सूचना रास्त वाटायला लागते. प्रस्तावनेत ही सूचना लेखिकेने दिली आहे.

'ही कादंबरी म्हणजे जी.एं.च्या निव्वळ प्रेमभंगाची कथा न ठरता ज्ञानमार्गावरील एका प्रवाशाची शोधकथा,

एक महान साहित्यिकाची वाङ्मयीन जीवनगाथा, असं स्वरूप तिला यायला हवं' ही प्राचार्य हातकणंगलेकरांची महत्वाची सूचना कितीही रास्त वाटत असली तरी लेखिकेला दोघांना आणि विशेषत: त्यांच्या मानलेल्या बहिणीला म्हणजेच जी.एं.च्या प्रेयसीला न्याय द्यावचा असल्याने कदाचित ही कथा निव्वळ प्रेमभंगाचीच कथा होते असे स्पष्टपणे म्हणायला हवे.

कादंबरीची रचना अशी आहे की त्या कादंबरीतील प्रमुख पात्र स्वत:चं मनोगत मांडत जातात. 'मृत्युंजय' कादंबरी पद्धतीने विस्तारत जाते. जी.ए. (कथाकार) नायक. कमल नायकाची प्रेयसी. विद्या नायकाची विद्यार्थिनी व कमलची मानलेली बहीण. ही प्रमुख पात्र दोनदा किंवा तीनदा आपापली मनोगतं सांगतात. प्रकरण तिसरे मात्र व्यवसायबंधूंच्या मनोगताने व्यापले जाते. इतर कोणीही प्रमुख पात्र यामध्ये येत नाही. त्यांना स्थान मिळत नाही. दीर्घकाळ सहवासात राहिलेली नायकाची बहीण प्रभावती या कादंबरीत प्रमुख पात्र का होत नाही? या प्रश्नाचं उत्तर शोधताना असं सरळ सरळ उत्तर मिळू शकतं की आपलं प्रेमप्रकरण नायकाने जगापासून तर सोडाच पण घरापासून व बहिणीपासूनही फार कसोशीने लपवून ठेवले आहे. त्याचे उच्चारही या घरात निघू नयेत इतकी काळजी त्याने घेतली आहे. आणि म्हणूनच या पात्राला कादंबरीत स्थान नाही. यावरूनच आपण असंही म्हणू शकतो की ही कादंबरी केवळ प्रेमाची कथा सांगणारी आहे. त्यांच्या वाङ्मयीन जीवनाची कथा जर असती तर बहिणीचं मनोगत प्रमुख ठरलं असतं. अत्यावश्यक ठरलं असतं. किंबहुना जी.एं.च्या बहिणीने त्यांचं चरित्र लिहावं अशी अनेकांची इच्छा होती. पण ते साध्य झालं नाही. लेखकाचा निर्मिती क्षण, लेखनासाठी त्याने घेतलेला ध्यास व प्रयास, बाहेरच्या जगातून घरात आल्यानंतर उतरवून ठेवलेला मुखवटा, दु:खाने पिळवटलेला क्षण, आपलं मनोगत समजू नये म्हणून कसोशीने केलेला निष्फळ प्रयत्न इत्यादी अनेक तपशील त्यांची बहिणच मांडू शकली असती. पण ते पात्र फारसं कादंबरीत येत नाही इथेच ही कादंबरी वैयक्तिक राहते. इतकी वैयक्तिक राहते की कादंबरीचा नायक स्वत:च आपली कहाणी सांगत असला तरीही तो आपल्या बहिणीला दुजवी स्थान देत आहे. प्रेमाच्या क्षणांचे वर्णन वा आठवण असताना हे कदाचित ठिक होईल, पण जिथे त्यांच्या वाङ्मयाविषयी विचार आले आहेत तिथेही हे बहिणीचं पात्र फारच पुसट आहे.

जी.एं.च्या वाङ्मयाबद्दल स्वत:च नायक म्हणून ते काही सांगतायत पण तोही तपशील अत्यंत दुजवी असाच येत राहतो. संपूर्ण कादंबरीभर जास्त भर कशावर येतो तर नायकाच्या प्रत्येक कथासंग्रहाचं शीर्षक त्याने कसे शोधून काढले यावर! दुसरा भर येतो तो प्रत्येक कथेचा उगम सांगण्याच्या क्रियेवर. कादंबरीतील नायकाचं मनोगत वाचताना सतत तफावत जाणवते ती भाषेची. नायकाची भाषा ही जी.एं.ची भाषाच वाटत नाही. ती विद्या सप्रे-चौधरी यांची भाषा वाटते. अपवाद फक्त जी.एं.च्या कथेतील भाषेचा! जिथे जिथे ही भाषा वापरली आहे ती सोडून बाकी भाषा अत्यंत ठिगळ लावल्याप्रमाणे जोडल्यासारखी वाटते.

ही कादंबरी धड वैयक्तिक कथाही होत नाही व धड वाङ्मयीन जीवनकथाही होत नाही. कारण कादंबरीत आलेली इतर पात्रं उभी होतच नाहीत. सारी पात्रं सपाट पातळीवर वावरतात. उदाहरणार्थ - त्यांची आई, आबा, मावशी, बहीण वगैरे जिव्हाळ्याची माणसं खूपच क्षुल्लक वाटत राहतात. कथाकारच कादंबरीचा नायक आहे तेव्हा तो आपल्या कथेत आलेल्या पात्रांच्या बाहेरचं विश्व, त्याची उंची खोली अधिक गडदपणे सांगून जायला पाहिजे ते होत नाही. तसंच त्याच्या नातेवाईकांविषयी होत राहतं. 'तुती' या कथेत येणारे आबा आणि बहिण व संसाराचा गाडा ढकलणारी आई जितकी कथेत जिवंत वाटतात तितक्याच प्रतीचीही ही जिवंत माणसं मात्र नायकाच्या

मनोव्यापारात खुजी वाटतात. त्यांना फारसा आकारच येत नाही. लेखकानं स्वत:बरोबर मांडलेला हा वास्तुगळच आहे. अशा बेरीजवजाबाकी करण्याच्या उत्तर काळात लेखक जेव्हा विचार करतो तेव्हा तो या व्यक्तींचा इतका वरवरचा विचार कसा करतो? याचे कोडेच पडते. बरं वाङ्मयीन जीवनकथा असेल तर जी.एं.चा असंख्य पत्रव्यवहार या कादंबरीत अगदीच जेमतेम येतो. पत्र लिहिल्यानंतर आणि लिहिण्या आधीच्या प्रक्रिया इतक्या थंड प्रकारे हा नायक कसा काय व्यक्त करतो? मुळात काहीच मोजक्या माणसांच्या पत्रव्यवहाराचा व भेटीचाच उल्लेख येतो व इतरांचा येत नाही याला उत्तर काय? 'ललित' जी.ए. विशेषांकात प्रसिद्ध झालेल्या जयवंत दळवींचा एकमेव उत्तम लेखाचा व त्यातील सुंदर आठवणींचा प्रसंग मात्र कादंबरीत कुठेच येत नाही. असे कितीतरी प्रसंग काढून दाखवता येतील की त्यांचे उल्लेख या कादंबरीत येणं अत्यावश्यक होतं. पण ते आले नाहीत. असे जी.एं.च्या जीवनाला व्यापून राहिलेले प्रसंग जेव्हा त्यात येत नाहीत, तेव्हा मग त्याला वाङ्मयीन जीवनकथा कसे म्हणणार?

मग या कादंबरीत आहे तरी काय? असा प्रश्न सहज पडू शकतो. या कादंबरीतील नायक तिच्या जाण्याने विलक्षण दुखावलेला आहे. त्याचा अपमान झालेला आहे. त्या अपमानाचा बदला म्हणून तो शेवटपर्यंत तिने पाठवलेली पत्रंही परत करतो. त्यांच्या स्नेह्याकडे ती शेवटी एक पत्र पाठवते. नाईलाज म्हणून त्यांना हे पत्र घ्यावेच लागते. त्यांच्याकडून पत्र घेऊन नायक पत्र न वाचताच फाडून फेकून देतो. शेवटी त्याला तिची बाजू विद्या या त्यांच्या विद्यार्थिनीकडून समजते. त्यांची चूक त्यांच्या लक्षात येते. ज्या तळ्याकाठी बसून लग्नाच्या शपथा घेतलेल्या असतात त्या तळ्यात तिच्या भेटवस्तू विसर्जित करायला ते सांगतात. विद्या ह्या वस्तू अस्थी विसर्जित कराव्यात तशी करते. सुरुवातीपासून शेवटपर्यंत नायक तिचाच विचार करतोय, तिच्याच आठवणींनी व्याकूळ होतोय असेच चित्र दिसून येते. वाङ्मयीन गोष्टी फक्त तो लेखक आहे म्हणूनच येतात अन्यथा त्या आल्या नसत्या असे वाटत राहते.

प्रेमाची घटना वाचकाला समजल्यामुळे एक मात्र होते. त्यांच्या कथेचा एक वेगळा अन्वयार्थ वाचकाला लागू शकतो. जी.एं.च्या कथेत येणाऱ्या बदफैली दगाबाज स्त्रीचे चित्रणच जास्त का येते यावर प्रकाश पडू शकतो. 'ऑर्फियस' या मृत्यूविषयक उत्तम चिंतन करणाऱ्या कथेचा उगमही स्त्रीचा परपुरुषाचा सहवासामध्ये आहे हे लक्षात येते. या कथेत ऑर्फियस आपल्या बायकोला परत पाठवतो ते जाणूनबुजून. जी.ए. आपल्याकडे परत येऊ पाहणाऱ्या प्रियेला झिडकारतात कारण तिने एक संसार थाटला आहे. तिच्या नवऱ्याची छाया तिच्या भोवती असणार. या स्पर्शाला ती विसरू शकणार नाही. या विचारातून ऑर्फियस कथेचा जन्म झाला असावा असे या कादंबरी लेखिकेला सुचवायचे आहे. स्त्रीचा इतकाही परस्पर्श हे स्वीकारू शकत नाहीत. पण यातून जन्माला येते ऑर्फियस सारखी उत्तम कथा. जिला ग्रीक मिथचा आधार आहे पण संपूर्ण मिथच ते बदलवून टाकतात. जर जी.एं.चे प्रेमप्रकरण वाचकाला समजले नसते तर या कथेचा विशिष्ट अर्थ वाचकाला लागला असता.

'गूढयात्री' या कादंबरीत येणारे जी.एं.चे प्रेमप्रकरण हा धागा घेऊन त्यावर जी.एं.च्या कथा वेगवेगळ्या अर्थाने उलगडता नक्कीच येऊ शकतील. त्यामुळे लेखिकेने हा विषय कादंबरीचा करायच्या ऐवजी प्रबंधाचा केला असता तर तिने जी.एं.ना अधिक न्याय दिला असता असे वाटत राहते. मूळात या विषयात जीव अत्यंत थोडाच आहे. फार तर एका लेखाचा वा एखाद्या कथेचा. ती कथा वाढवताना त्यांचे इतर गुण लेखिकेला घ्यावे लागले त्यामुळे काहीच साध्य झाले नाही. थोर माणसावर चरित्रात्मक कादंबरी लिहिताना नेहमी एक भीती असते की त्या माणसाचे चरित्र इतके प्रसिद्ध असते की चरित्राऐवजी कादंबरी का लिहिली गेली असे

(पान क्र. ३३वर)

प्रार्थना म्हणजे आत्म्याच्या अगाध शक्तिला जागृत करणारे दैवी बल आहे - महाभारत

# तंत्रनिकेतनाच्या ग्रंथालयातील एक महत्त्वाचा संदर्भग्रंथ

*ग्रंथालयात संदर्भ ग्रंथांचे महत्त्व वेगळेच असते. महाविद्यालय परिसरातील ग्रंथालये या दृष्टीने अतिशय समृद्ध आहेत. तंत्रनिकेतनाच्या ग्रंथालयात असणाऱ्या अशाच एका महत्त्वपूर्ण संदर्भ ग्रंथाची ही माहिती. - संपादक*

तंत्रनिकेतनातील ग्रंथालयात एक महत्त्वाचा संदर्भग्रंथ आहे. तो म्हणजे कर्क ऑथमर (Kirk Othmer) यांचा 'एन्सायक्लोपीडिया ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी'. याचे २४ खंड आहेत. व या खंडांतून विषयानुसार वापरण्यासाठी Index ही त्यांनी पुरविले आहेत. एकेक खंड म्हणजे अक्षरशः माहितीचे आगार आहे. केमिकल टेक्नॉलॉजीवर हे संदर्भग्रंथ आहेत. पण त्या अनुषंगाने पुष्कळ माहिती यात मिळते. काही वेळा विद्यार्थ्यांकडून अथवा शिक्षकवर्गाकडून एखाद्या विषयावर विचारणा होते तेव्हा तो विषय हमखास यात सापडणार ही खात्री असते. केमिकल टेक्नॉलॉजी या विषयावर ही एक 'भगवद् गीताच' आहे. या खंडांची रचना आद्याक्षराप्रमाणे आहे. त्यामुळे विषय शोधण्यासही मदत होते.

केमिकल इंडस्ट्रीला या संदर्भग्रंथाचा आधार वाटावा असा हा ग्रंथ आहे. या ज्ञानकोशाचे महत्त्व म्हणजे केमिकल प्रॉडक्ट आणि मटेरियल्स याचीही माहिती यामधून मिळते. यात केमिकल ॲबस्ट्रॅक्टस् रजिस्टरी नंबरचाही समावेश आहे. यात पॉलिमर, प्लॅस्टिक टेक्नॉलॉजी, फ्युएल्स आणि एनर्जी, इनऑरगॅनिक आणि सॉलिड स्टेट केमिस्ट्री, कॉम्पोझिट मेटरिअल्स, कोटिंग्ज, फर्मेन्टेशन, फायबर्स, टेक्सटाईल्स, फार्मास्युटीकल्स इ. सारखे नवीन विषयही अंतर्भूत आहेत. अचूकता व वस्तुनिष्ठता हे या खंडांचे विशेष गुण आहेत. या खंडांचा मुख्य विषय केमिकल टेक्नॉलॉजी हा आहे. केमिकल सबस्टन्सवरही काही लेख आहेत. उदाहरणार्थ - ॲल्युमिनियम कंपाऊंडस् इंडस्ट्रीयल प्रोसेसचाही यात समावेश आहे. क्रॉस रेफरन्सही या ज्ञानकोशाच्या वाचकाला उपयुक्त ठरतील असे आहेत.

प्रथम खंडात केमिकल ॲबस्ट्रॅक्ट सर्व्हिस रजिस्टरी नंबर येतात (CAS). न्यूमेरिकल आयडेंटीफायर त्या सबस्टन्सला CAS रजिस्टरी सिस्टिमप्रमाणे दिलेले असतात. यानंतर कन्व्हर्शन फॅक्टर, ॲब्रिव्हिएशनस (संक्षिप्त रूप) आणि युनिट सिंबॉल्सही या खंडात दिलेले आहेत. यात SI युनिटस् तीन भागात विभागले आहेत. बेस युनिट, सप्लीमेंटरी युनिट, Derived युनिटस् आणि Acceptable युनिटस्. हे सिंबॉल्स त्यांनी खाली दिल्याप्रमाणे दिलेले आहेत. Quality, unit, symbol & acceptable equivalent. प्रत्येक प्रकरणाच्या शेवटी बिब्लिऑग्राफी दिलेली आहे.

यानंतर खंडातील विषयांची सुरुवात आद्याक्षरांप्रमाणे सुरु होते. प्रत्येक खंडाच्यावर एन्सायक्लोपीडिया ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी, कर्क - ऑथमर असे लिहिले आहे. त्यानंतर खंडाचा क्रमांक, किती ते किती व कोणती आद्याक्षरे त्या खंडात समाविष्ट आहेत ती दिलेली आहेत. उदाहरणार्थ - (A to Alkanolemines)

या खंडाची बांधणीही उत्तम आहे. ग्रंथ पाहतानाच हा हाताळावा असे वाटते. व एकदा खंड उघडले की त्या माहितीच्या जंजाळात आपण हरवून जातो.

सर्वात शेवटी या ज्ञानकोशासाठी एक सप्लीमेंटरी व्हॉल्यूम दिला आहे. त्यात Alcohol fuels to Toxicology अशी सर्व आद्याक्षरे अंतर्भूत आहेत. ह्या सप्लीमेंटरी खंडाचा हेतू असा की १ ते २४ खंडांत जेवढी आर्टीकल्स

आलेली आहेत ती काही प्रमाणात अपडेट ठेवणे. त्याचप्रमाणे काही टॉपिक नवीन विषयांवर असतील तर ते समाविष्ट करणे. केमिकल टेक्नॉलॉजीच्या माहितीचे क्षितिज रुंदावणे हे यामुळे शक्य होते. सातत्याने विषयावर नवनवीन शोध होत असतात. बदल होत असतात ते या खंडांमधून सविस्तरपणे दिलेले आहेत. या खंडाचीही रचना आद्याक्षराप्रमाणे केलेली आहे. शिवाय क्रॉस रेफरन्सही यात दिलेले आहेत.

,आणि एक विशेष म्हणजे या खंडांसाठी म्हणजे ५ ते ८ अशा वेगवेगळ्या खंडांसाठी १ इंडेक्स असा त्यांनी दिलेला आहे. ह्याचीही रचना आद्याक्षराप्रमाणे आहे. चार खंडांसाठी १ असे प्रत्येकी इंडेक्स त्यांनी दिलेले आहेत. ही एक विशेष सुविधा या संदर्भग्रंथाला आहे. व त्या विषयाच्या पुढे कंसात खंड क्रमांक व पान क्रमांक दिलेले आहेत. त्यामुळे एखादा विषय कोणत्या खंडात व कोणत्या पानावर आहे हे या इंडेक्समुळे लगेच समजते व वाचकाचा वेळ विषय शोधण्यात वाया जात नाही. एकंदर हे सर्व खंड पाहता केमिकल टेक्नॉलॉजीवर हा एक उत्तम ज्ञानकोश आहे.

एन्सायक्लोपीडिया ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी १९८६ साली आपल्या ग्रंथालयात खरेदी केला आहे. या २४ खंडांचे संपादक आहेत कर्क आणि ऑथमर. खरेदी केले तेव्हा खंडांचे मूल्य ३२५०८ रु. इतके होते व आवृत्ती तिसरी होती. या खंडांचे प्रकाशक जॉन वायले अँड सन्स आहेत व न्यूयॉर्क येथून हे प्रकाशित केले गेले आहेत. प्रत्येक खंडाचे एक्झिक्यूटिव्ह एडीटर मार्टिन ग्रेसन (Grayson) आणि इतर आहेत, पण याचे कॉन्ट्रिब्यूटर्स वेगवेगळे आहेत.

**सौ. भारती जोशी**
ग्रंथपाल, वि.प्र. मंडळाचे तंत्रनिकेतन, ठाणे.
०००

॥ श्री ॥

शैला जोगळेकर
३/१९, हेदवकर वाडी नं. १
गोखले रोड साऊथ,
दादर, मुंबई - ४०० ०२८.

२०/१/२००१

प्रति,
संपादक
व्हि.पी. एम्. 'दिशा'
स.न.वि.वि.

मी आपल्या 'दिशा' मासिकाची नियमित वाचक आहे. यातील लेख वाचून मला प्रेरणा मिळाली व काही लेखन करून आपल्याकडे पाठवले. त्याला 'दिशा' तून प्रसिद्धी दिल्याबद्दल मन:पूर्वक धन्यवाद ! कारण त्यामुळे मला लिहिण्यासाठी प्रोत्साहन मिळाले. आम्हा नवीन लेखकांना विचार व्यक्त करण्यासाठी नवीन व्यासपीठ मिळाले. आपले अंक नेहमीच दर्जेदार व संग्राह्य असतात. त्यामुळे सभासदत्व स्वीकारायचे असे ठरवले आहे.

अंकासंबंधात काही सुचवावेसे वाटते यात कलाविभाग सातत्याने येत राहील हे पहावे. कृपया आपल्या एखाद्या अंकात या पत्रास प्रसिद्धी द्यावी.

असो, कळावे,

आपली कृपाभिलाषी,
**शैला जोगळेकर**

खोटी प्रशंसा अत्यंत दु:ख देणारी असते.- कवि कुलगुरु कालिदास


# वैभवशाली विजयनगर साम्राज्याची राजधानी - हंपी

*विजयनगरच्या वैभवशाली साम्राज्यातील कला विश्वाचा हा परिचय - संपादक*

'विजयनगरसारखे साम्राज्य मी आजपर्यंत कोठेही पाहिले नव्हते' अशा शद्बात जगप्रसिद्ध मुस्लिम पर्यटक अब्दुल रझाक याने वर्णन केले होते. १४४३ मध्ये विजयनगरच्या राजधानीला - हंपीला भेट दिल्यानंतर त्यांनी वरील गौरवोद्‌गार काढले होते. विजयनगरच्या वैभवाच्या खुणा आजही येथे पहाण्यास मिळतात. फक्त ते वैभव आणवते ते कालौघात नष्ट झालेल्या आणि इतिहासाने जपलेल्या या साम्राज्याच्या ढासळल्या खुणांमधून. आज विजयनगरचे फक्त अवशेषच आपल्याला हंपीला भेट दिल्यानंतर दिसतात. पण या अवशेषांकडे पाहिल्यावर मूळ विजयनगर किती वैभवशाली आणि समृद्ध असावे याची पुरेपूर कल्पना येते.

विजयनगर साम्राज्याचा काळ हा भारतीय कलांचा उत्कर्षकाल मानला जातो. कारण त्या काळातील कलाकृती मध्ययुगीन कलाकृतींमध्ये सर्वोत्कृष्ट मानल्या जातात. तुलुव वंशातील कृष्णदेवरायाच्या राजवटीत कलांचा परमोत्कर्ष झाला. विजयनगर काळात द्राविड पद्धतीची अनेक मंदिरे निर्माण झाली. त्याचप्रमाणे अनेक राजप्रासादही त्या काळी बांधले गेले. तालिकोटच्या युद्धानंतर मुसलमानांनी बहुतेक शिल्पकृतींचा नाश केला तथापि जी मंदिरे अजून उभी आहेत ती पाहून त्या काळातील वास्तुकलेची चांगली कल्पना येते.

हंपीतील विरूपाक्ष मंदिराकडे पाहिल्यावर विजयनगर साम्राज्य किती भव्यदिव्य होते याची प्रचीती येते. हंपी बाजार या सुप्रसिद्ध ७०० मीटर लांबीच्या रस्त्याला लागून हे मंदिर आहे. आपल्या गुरुचे स्मारक म्हणून हरिहराने हे मंदिर बांधले. कृष्णदेवराय सिंहासनावर बसल्यानंतर त्याने




विरूपाक्ष मंदिर (हंपी)

या मंदिरासमोर १६५ फूट उंचीचे व ११ मजल्यांचे गोपुर बनवले. विरूपाक्ष मंदिराला दोन प्रांगणे आहेत. पूर्व गोपुरातून आत गेल्यावर ती एकापुढे एक लागतात. पहिल्या प्रांगणापेक्षा दुसरे अधिक विस्तृत आहे आणि त्यातच विरूपाक्ष मंदिर आहे. त्याच्या परिसरात अनेक छोटी मोठी मंदिरे आहेत. मुख्य मंदिरावर सोन्याचा कळस आहे. या मंदिरात चैत्रात दहा दिवस महोत्सव असतो. पौर्णिमेच्या दिवशी रथोत्सव असतो.


इथले दुसरे भव्य देवस्थान म्हणजे विठ्ठलस्वामींचे मंदिर होय. याचे प्रांगणच मुळी ५०० फूट लांब आणि ३०० फूट रुंद आहे. या मंदिराचा प्रदक्षिणापथ चौकोनी असून गाभाऱ्यापेक्षा खोल आहे. प्रदक्षिणामार्ग धरून गाभाऱ्याचे शिखर बनवले आहे. शिखराच्या मुळाशी वेलबुट्टीचे अलंकरण खोदले आहे. या भागाला उपानय असे शिल्पशास्त्रीय नाव आहे. शिखरमध्याला कुमुदम म्हणतात. तोही अलंकृत आहे. त्यावरचा भाग तो कंठम. त्यावर नृत्य करणाऱ्या गणिका व अन्य काही सामाजिक चित्रे कोरली

गरीबांची सेवा हीच खरी ईश्वरसेवा आहे. - सरदार वल्लभभाई पटेल




विठ्ठल स्वामी मंदिर (अनुविक्षेप)

आहेत. सर्वात वर पालथे कमळ आहे. या मंदिराला सभामंडप व अर्धमंडप दोन्ही आहेत. एकसंध बाराफुटी ५६ खांब अर्धमंडपाला तोलून धरतात. सगळे खांब अलंकृत व कोरून सुंदर बनवले आहेत. याचे वैशिष्ट असे की या खांबांना हलकासा स्पर्श करताच संगीताचे सूर निघतात.



विठ्ठलस्वामींचे मंदिर (कल्याणमंडप) -हंपी

याच प्रकारात आणखी एक मंडप आहे. त्याचे नाव **कल्याणमंडप**. या मंडपात पूर्वी देवाचा वार्षिक विवाह सोहळा होत असे. इथे महामंडपाच्या समोर एक विशाल रथ पाषाणापासून कोरून काढला आहे. तो सर्वांगसुंदर, सुबद्ध असून त्याची उंची २६ फूट आहे. त्याची दगडी चाके अशा प्रकारे कोरून बनवली आहेत की ती अल्पशा प्रयत्नाने फिरवता येतात. हंपीच्या शिल्पकलेच्या मस्तकी तो जणू राजमुकुट शोभतो.




पाषाण रथ -विठ्ठल मंदिर

येथील हजारा राममंदिरही पाहण्यासारखे. या मंदिराचे खांब गोलाकार आहेत व ते सगळे कोरीव कामाने अलंकृत आहेत. याचे शिखर अत्यंत सुंदर आहे. छतावर आतून वेलबुट्टीचे अलंकरण आहे. या मंदिराचे खास वैशिष्ट्य म्हणजे त्याच्या भिंतींच्या दगडात कोरलेले रामचरित्र होय.

हंपीमध्ये अशी कित्येक अद्‌भूत ठिकाणे आहेत. राज तराजू हे त्यापैकीच एक. सत्तारूढ असलेल्या राजाची तुला या तराजूतून केली जात असे. ही तुला करण्याकरता सोने-नाणे, रूपे, धान्य यांचा वापर केला जात असे. हा तुलेचा कार्यक्रम संपन्न झाला की त्याचे वाटप गोरगरीबात केले जात असे.

राणीने स्नान करण्याची जागाही पाहण्याजोगी अशीच आहे. नक्षीदार आणि कोरीव काम केलेले दालन, खास तयार केलेला सज्जा, कमलाकृती कारंजी यांनी ही जागा देखणी बनवली आहे.



कमलमहाल -हंपी

कमलमहाल ही दुमजली वास्तू म्हणजे बगीचातील बंगलाच आहे. ही वास्तू भूमिती तत्त्वावर बांधलेली आहे. ही अत्यंत दुमदार असून त्यात द्रविड व मुस्लिम स्थापत्यकलेचे मनोहर मिश्रण झालेले दिसते.

इथले आणखी प्रेक्षणीय असे शिल्प म्हणजे नरसिंह. तो आसनमांडी घालून बसला आहे, तरी त्याची उंची ६/७ मीटर सहज असेल. त्याच्या मस्तकी नागफणीचे छत्र आहे व त्याहीवर कीर्तीमुख म्हणजे उंची आणखीनच वाढते. इथे त्याच्या मांडीवर हिरण्यकश्यपू नाही पण तरीही त्याचा जबडा उघडलेला आणि डोळे बाहेर आलेले आहेत. अशा या नरसिंहाच्या उग्र रूपाचे दर्शन हे शिल्प घडवते. आता हे शिल्प भग्नावस्थेत आहे.

हंपी हे असे समृद्ध आहे. हंपी हे घाईगर्दीने पाहण्याजोगे गाव नाही. हंपीकरता निवांत वेळ हवा. कारण इथल्या प्रत्येक वास्तूत इतिहास लपलेला आहे. गतवैभवाच्या खुणा प्रत्येक ठिकाणातून शोधायच्या म्हटले तर निवांत वेळ हवाच. हंपीत कन्नड, हिंदी आणि इंग्रजी या भाषा बोलल्या जातात. येथे जाण्यासाठी ऑक्टोबर ते मार्च हा कालावधी चांगला. दरवर्षी डिसेंबर महिन्यात कर्नाटक राज्य सरकारतर्फे 'विजयनगर महोत्सव' आयोजित केला जातो. या महोत्सवात नृत्य, नाटक, संगीत, शोभेचे



नरसिंह -हंपी

दारुकाम, बाहुल्यांचा कार्यक्रम, नेत्रदिपक मिरवणूक अशा वैशिष्ट्यपूर्ण कार्यक्रमांचा समावेश असतो.

हंपी येथे जाण्यासाठी होस्पेट हे तेथून सर्वात जवळचे रेल्वेस्थानक आहे.

*आधार :-*


- *संस्कृतिकोश*
- *History of Indian & Western Art.*



**सौ. मंजिरी मा. दांडेकर**
मधु-मिलिंद बंगला
घंटाळी रोड, नौपाडा, ठाणे - ४०० ६०२.


• • •

# ‘सहजसाध्य पैशाची हाव’ ; धनतृष्णा


*पैसा सहजसाध्य झाला आणि समाजाच्या नीतीविषयक कल्पना बदलल्या, जीवनशैली बदलली. त्या विषयी.*
*- संपादक*

‘कशासाठी-पोटासाठी’ असं प्रामाणिकपणे म्हणत, काबाडकष्ट करून प्रामाणिकपणे पैसा मिळवण्याचे दिवस मागे पडत चालल्याचे आजच्या समाजाचे दृश्य आहे. रोजच्या वर्तमानपत्रातील भ्रष्टाचाराच्या, खून, दिवसा-ढवळ्या पडणाऱ्या दरोड्याच्या बातम्या, राजकीय भ्रष्टाचाऱ्यांच्या बातम्या ह्यावरून तर हे अगदी ठळकपणे जाणवतेच!

प्रत्येकालाच वाटत असतं की आपण श्रीमंत असावं, आपल्याजवळ भरपूर पैसा असावा आणि आपण अगदी चैनीत राहून कुटुंबातील लहान थोरांची हौस भागवावी! कोणाची हौस ही अंथरूण पाहून पाय पसरण्याच्या वृत्तीत भागते तर बहुतांशी लोक हे अधिकाधिक पैसा मिळविण्यापोटी रोजची सुखाची झोपही घालवून बसतात. काही लोक कितीही पैसा मिळाला तरी असमाधानी, असंतुष्ट वृत्तीने, सतत दुसऱ्यांशी तुलना करण्याच्या वृत्तीने मत्सरी, हेवा-द्वेष करणारे होऊन समाजातील व घरातीलही शांती बिघडवतात.

या अशा वृत्तीमधूनच धनतृष्णेचा ध्यास लागतो आणि मग पैसा मिळवताना आपण कुठे थांबायचे हा सारासार विचार नष्ट होऊन, विवेकबुद्धी खुंटते; माणूस मग वाटेल त्या मार्गाने, वाटेल त्या थराला जाऊन पैसा मिळवण्याची धडपड सुरु करतो. ह्यावेळेला कधी गुन्हेगारी मार्गाचा अवलंब होतो, तर कधी दुसऱ्यांची फसवणूक करून स्वतःचे समाधान(!) मिळवण्याची धडपड होते. समाजात गुन्हेगारी, वेश्या व्यवसाय, सट्टेबाजी, जुगार, चोऱ्या, बालगुन्हेगारी, बाल मजुरी इ. अपप्रवृत्तींची वाढ वेगाने होते. अशा मार्गाने सहज पैसा मिळतो असेही वाटू लागते. राजकीय पुढाऱ्यांची सत्तेसाठी चाललेली चढाओढ म्हणजेच पर्यायाने पैसा साठवण्याची वृत्ती, न्यायसंस्थेतील भ्रष्टाचार ह्या गोष्टीही सहजसाध्य पैशाच्या मोहातून सुटलेल्या नाहीत.

धनतृष्णा किंवा पैशाची हाव ही अनेक कारणांमुळे वाढत चाललेली दिसते. ह्या कारणात आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक, मानसिक व सामाजिक बदलांचा प्रामुख्याने विचार करावा लागेल.



**आर्थिक कारणे :-**

वाढती महागाई, बेकारी, घसरत जाणारे रुपयाचे मूल्य, घसरणारा शेअर निर्देशांक इ. मुळे कितीही पैसा मिळाला तरी तो अपुरा वाटू लागतो. नवीन नवीन शोधांमुळे बाजारात येणारी महागडी उपकरणे व त्या अनुषंगाने येणारी विजेची बिलेही आवश्यक बनली असून त्यासाठी लागणारा पैसा हा आवश्यक ठरला तर ही उपकरणे व त्यांचा ध्यास हा पैशाची हाव वाढवू लागला. फ्रीज, मिक्सर, गिझर आवश्यक बाब झाली, तर फोन आहे मग कॉडलेस उपकरण हवे, मोबाईलही हवा ही हाव आपल्या खिशाचा विचार न करता वाढू लागली. तसेच जुने अनेक उद्योगधंदे बंद पडून (कापडगिरण्या इ.) बेकारी वाढली, आर्थिक चणचण वाढली.

**सामाजिक कारणे :-**

स्त्रीशिक्षणामुळे स्त्रियांच्या कर्तृत्वाला वाव मिळू लागला. शिवाय वाढत्या महागाईमुळेही स्त्रियांना नोकरीसाठी घराबाहेर रहाणे अपरिहार्य ठरले. या अनुषंगाने लागणाऱ्या सोयी व गरजा पूर्ण करण्यासाठीही पैशाची गरज वाढली. उदा. पाळणाघरे, फास्टफूडस्, रेडिमेड किंवा तयार अन्नधान्ये, झटपट पाककृती, वृद्धाश्रम, हॉटेलमध्ये खाणे, मुलांच्या हातात द्यावा लागणारा पैसा, शैक्षणिक फी इ. कारणांसाठी व चैनीसाठी पैशाची हाव वाढू लागली.

**सांस्कृतिक कारणे :-**

पूर्वापार चालत आलेल्या रूढी बदलून सर्वच स्तरात लोकांचे धार्मिक आचार-विचार, पोशाख, रितीरिवाज ह्यात सुधारणा झाल्या तर काही ठिकाणी बदल झाले. उदा. स्त्रिया फक्त साड्या किंवा मुली फक्त परकर-पोलका अशी पारंपरिक वेशभूषा न करता तऱ्हेतऱ्हेचे कपडे वापरू लागल्या. देवा-धर्माचे सार्वजनिक प्रकटीकरण वाढले. ढोंगी साधू, बुवाबाजी हेही महत्त्वाचे कारण ठरले. गणेशोत्सव, नवरात्री ह्या सार्वजनिक उत्सवाबरोबरच 'व्हॅलेंटाईन डे', 'मदर डे', ख्रिसमस इ. उत्सवही वाढले. तसेच ह्यासाठी होणाऱ्या जेवणावळी, भेटी देणे, लागणारे पोशाख ह्यावरील खर्च वाढला. हॉटेलसमध्ये, रस्त्यावर खाण्याचे प्रकार वाढले व त्यासाठी लागणारा पैसा ही गरज ठरू लागली. सिनेमा, नाटके, ब्युटीपार्लरमध्ये जाणे हे प्रतिष्ठेचे वाटू लागले आणि तरुणवर्गात व बालवर्गातही पैशाची हाव वाढू लागली. त्यातच दूरदर्शन, सिनेमातील भयानक दृश्ये, गुन्हेगारी ह्यांचा परिणाम होऊन पैशासाठी, प्रेम मिळवण्यासाठीही खून, मारामाऱ्या, चोऱ्या वाढल्या. बालगुन्हेगारीचे प्रमाण वाढले ते बऱ्याच अंशी पैशाच्या हव्यासापोटी. (बालगुन्हेगारीसाठी दुसरीही कारणे आहेत पण पैसा हे एक महत्त्वाचे कारण) श्रीमंतीचे अनुकरण करणे, कर्ज काढून सण करणे ही वृत्तीही अधिक पैसा मिळवण्यास प्रवृत्त करू लागली.

**राजकीय कारणे :-**

माहिती व तंत्रज्ञानासाठी विदेशी व्यापार, विदेशी गुंतवणूक, आयात-निर्यात महत्त्वाचे ठरते. विदेशात शिक्षण, विदेशी नोकऱ्या, विदेशी माल ह्यांचे आकर्षण समाजात वाढले आणि त्यासाठी लागणारा पैसा मिळवण्याची जीवघेणी चढाओढ सुरु झाली. खोटी कागदपत्रे करणे, खोट्या पदव्या तयार करणे, परदेशी नोकरीचे आमिष दाखवून लुबाडणे व पैसा कमावणे याचेही प्रमाण वाढले. आज आपण पहातो, विदेशी माल वापरतो हे बरेच जण अभिमानाने सांगतात. सरकारी लोकांचे विदेश दौरे, सरकारी खात्यातील भ्रष्टाचार, खुर्चीसाठीची धडपड, पोलीस खाते, न्यायखात्यातील भ्रष्टाचार हा पैसा मिळवण्याचा सहज मार्गच वाटू लागला आहे.

**शैक्षणिक कारणे :-**

उच्च शिक्षण घेणे, हव्या त्या शाखेत प्रवेश मिळणे हे ९५% / ९०% मार्क मिळूनही कठीण होऊ लागले. वाढत्या शिक्षणाच्या मागणीमुळे एकेका वर्गात मुलांची संख्या खूपच होऊन, शाळा, कॉलेजमधून मुलांकडे वैयक्तिक लक्ष देणे अशक्य झाले. क्लासेसना जाणे वाढले. शिक्षणाचा खर्च वाढला आणि एवढे करूनही बेकारी. नोकरी मिळणे अवघड होऊ लागले, वैफल्यग्रस्त तरुण वर्ग सहजमार्गांनी पैसा मिळवण्यासाठी धडपडू लागला.

**मानसिक कारणे :-**

जन्मजात द्वेष, मत्सर, असूया असणाऱ्या लोकांबरोबरच वरील कारणांमुळे मनावर परिणाम होऊन, कायदे न पाळणे, नियमांचे उल्लंघन करणे, चोऱ्या करणे, दरोडे घालणे इ. मार्गही राजरोस चोखंदळले जाऊ लागले. एखाद्या सुशिक्षित डॉक्टरपेक्षा साधे कपडे विकून वा दुसरा साधा व्यापार करूनही (लबाडीने) पैसा भरपूर मिळतो हे दिसून येऊ लागले व तरुणांची मानसिकता बदलली. थोडी

---

लबाडी केली तरी चालेल. प्रामाणिकपणा आपल्याला काय फायदा देणार अशी वृत्ती वाढली. काही वैफल्यग्रस्त, सूडबुद्धीने वागणाराही गट तयार झाला. काहीही करा पण पैसा मिळवा, पैसा हाच सर्वश्रेष्ठ आहे बाकी सर्व झूठ अशी विचारसरणी होऊन पैसा तोही सहज कसा मिळेल हेच ध्येय ठरू लागले.

आपली पैशाची हाव भागवताना सर्वसामान्य माणूसही ह्यातून सुटलेला दिसत नाही. प्रत्येक खरेदीवर मिळणारी बक्षिसे, सवलती, जास्त व्याजदराने गुंतवणूक करण्याचा कल, लॉटरी ह्या मोहात आपणही कधी ना कधी ओढले जातोच! असा हा मोहात टाकणारा पैसा मिळवताना कुठे थांबायचे ह्याचे भान समाजाला आले तर समाजातील अपप्रवृत्ती खूपच कमी होतील.

सहजसाध्य पैशाच्या मागे धावताना दोन प्रकार समाजात झालेले आढळतात.

१) दुसऱ्यांना त्रास न होता केवळ नशिबाने मिळणारा पैसा - उदा. लॉटरी, टी.व्ही. वरून होणाऱ्या बक्षिसांची खैरात, वेगवेगळ्या स्पर्धा व त्यातून मिळणारी बक्षिसे इ. ह्यात टी.व्ही. वरील मालिकांचा पगडा व ओढ जास्त प्रमाणात समाजावर झालेला आढळतो. 'कौन बनेगा करोडपती', 'सब खेलो सब खेलो', 'फॅमिली फॉरच्यून', 'छप्पर फाडके' इ. ची लोकप्रियता हेच दर्शविते.

२) दुसऱ्यांना त्रास देऊन किंवा दहशतवादाने, बेईमानी करून, कायदेभंग करून मिळवला जाणारा पैसा - उदा. गुन्हेगारी क्षेत्राशी संबंध ठेवून सिनेमाक्षेत्रात होणारी कोट्यावधींची गुंतवणूक, दरोडे, लूटमार, खून करून घर लुटणे, २२% व्याज देतो सांगून रक्कम जमवून कंपन्यांना टाळे लावून पसार होणे, फोनवरून बक्षिसे घेऊन जा असे सांगून फसवणे इ.

हा दुसरा मार्ग अतिशयच धोकादायक व समाजातील शांती, स्थैर्य बिघडवणारा असून फारच घातक आहे.

'पैसा' हा अत्यावश्यक आहेच पण तो कोणत्या मार्गाने व कसा मिळवायचा हे प्रत्येकाने आपली विवेकबुद्धी जागृत ठेवून ठरवले पाहिजे. थोडासा त्याग, थोडी समाधानी वृत्ती, आपल्याला अनेक संकटांपासून वाचवू शकते. 'पैसा हा स्वतःच्या व पर्यायाने समाजाच्या व देशाच्या प्रगतीसाठी आहे', ह्याचे भान ठेवले तर भारतात माहिती व तंत्रज्ञानाच्या सहाय्याने परत सुवर्णयुग अवतरल्याशिवाय रहाणार नाही!

**वेदवती हब्बु**
सहाय्यक ग्रंथपाल, जवाहरलाल नेहरू ग्रंथालय,
विद्यानगरी, सांताक्रुझ (पू.), मुंबई ४०० ०९८.
दूरध्वनी : ४४५६८८२

* * *

दुःखद निधन



**श्री. विठ्ठल नारायण मराठे**

विद्या प्रसारक मंडळाच्या कार्यकारिणीचे सभासद व माजी कोषाध्यक्ष श्री. विठ्ठल नारायण मराठे यांचे दि. २२ फेब्रु. २००१ रोजी रात्री १०.३० च्या सुमारास हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. ते ८० वर्षांचे होते. १९८७ ते १९९७ अशी सलग १० वर्षे त्यांनी मंडळाच्या कोषाध्यक्ष पदावर काम केले.

ईश्वर मृतात्म्यास शांती देवो.

# राष्ट्रीय पुस्तक मेळा


*अलीकडेच मुंबईत झालेल्या भव्य ग्रंथ प्रदर्शनास ग्रंथपालन शाखाच्या विद्यार्थ्यांनी भेट दिली. त्या भेटीचा हा वृत्तान्तलेख. हे प्रदर्शन ३० डिसेंबर २००० ते ७ जानेवारी २००१ या अवधीत भरले होते. - संपादक*

ग्रंथपालनाचे क्षेत्र निवडल्यापासून कित्येक ग्रंथ प्रदर्शनांना भेटी दिल्या गेल्या. नुकत्याच चर्चगेट येथे नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया; बॉम्बे बुक सेलर्स अँण्ड पब्लिशर्स असोसिएशन आणि मराठी ग्रंथ प्रकाशक संघटना यांनी संयुक्तरित्या आयोजित केलेल्या 'राष्ट्रीय पुस्तकमेळा' या भव्य ग्रंथ प्रदर्शनाला भेट देण्याचा योग आला.

चर्चगेटचे संपूर्ण क्रॉस मैदान या प्रदर्शनामुळे व्यापले होते यावरूनच याची भव्यता लक्षात येते. एकूण २४० प्रकाशक व विक्रेते यांचा यात सहभाग होता. या प्रदर्शनाचे वैशिष्ट्य म्हणजे संपूर्ण भारतातील निरनिराळ्या प्रकाशकांनी आणि विक्रेत्यांनी यात सहभाग घेतला होता.

ग्रंथपाल आणि पुस्तक प्रेमींबरोबरच लहान मुलांना देखील ह्या प्रदर्शनाने आकर्षित केले. लहान मुलांना आवडतील अशी रंगीत आणि त्यांच्या विकासास पूरक अशी भाषा, ज्ञान व विज्ञानाशी निगडित अनेक खेळणी येथे होती. २१ व्या शतकातील पहिलेच प्रदर्शन संगणक युगाचे प्रतिनिधित्व करणारे होते. लहान मुलांचे संगणकाविषयी वाढते आकर्षण लक्षात घेऊन येथे Computer Games ची सोय करण्यात आली होती. या खेळाबरोबरच शैक्षणिक आणि गोष्टींच्या CD's मुबलक प्रमाणात उपलब्ध होत्या.

केवळ खेळ आणि संगणकच नव्हे तर चित्रमय आणि रंगीत व त्रिमितीय परिणाम असणारी पुस्तकेही आपल्या चिमुरड्या वाचकांना खुणावत होती.



Tata Donley यांची 'Good Manners' लहान मुलांना सोप्या भाषेत शिकवता येतील अशी पुस्तके आणि नवनीत प्रकाशनाची पंचतंत्रावरील निरनिराळ्या भाषांमधील गोष्टींची चित्रमय आणि रंगीत पुस्तके विशेष लक्षवेधी होती. (भाषा :-मराठी, हिंदी, इंग्रजी, गुजराथी)

खेळाबरोबरच मानवी आकर्षणाचा भाग म्हणजे 'खानपान' या विषयावर देखील SNAB Publishers, New Delhi यांनी उत्तमोत्तम ग्रंथ प्रदर्शित केले होते. Veg, Non Veg, Quick Neacy Series, Best Selling Hind Titles अशा प्रकारातील अनेक ग्रंथ पहावयास मिळाले. निरनिराळ्या प्रदेशातील भोजन पदार्थावरील पुस्तकांबरोबरच त्या ठिकाणांचे प्रादेशिक स्थान दर्शविणारे

नकाशे, रस्त्यांचे नकाशे, नॅशनल बुक सेंटर, मुंबई यांनी प्रदर्शनात मांडले होते.

तरुणांची गर्दी खेचून घेणारे स्टॉलस् म्हणजे स्टुडंटस् एड पब्लिकेशनस्, दिल्ली हे ठरले. कारण तरुणांसाठी निरनिराळ्या Career Directories येथे वाजवी किंमतीत उपलब्ध होत्या.

ललित वाङमय प्रकाशक व विक्रेते यांचे स्टॉल म्हणजे जणू वाचनप्रेमींसाठी खजानाच होता. कारण सर्व वयोगटातील वाचकांना आकर्षित करून प्रत्येकाच्या आवडीचा ग्रंथ तेथे त्यांनी उपलब्ध करून दिला होता. मराठी रसिकांचे आवडते व लाडके साहित्यिक पु. ल. यांची नवीनतम पुस्तके पहावयास मिळाली. नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया ही भारत सरकारतर्फे चालवली जाणारी १९५७ साली स्थापन झालेली संस्था समाजात वाचनाची आवड रुजवण्याचे कार्य अगदी चोखपणे बजावत असल्याचे निदर्शनास आले. कारण तरुणभारती, लोकोपयोगी विज्ञान, आदानप्रदान, अक्षरवाङ्मय, राष्ट्रीय चरित्रमाला, लोक साहित्यमाला, नवसाक्षर साहित्यमाला, ग्रामीण वाचनमाला, नेहरू बाल पुस्तकालय व सृजनात्मक शिक्षण अशा शीर्षकाखाली निरनिराळी पुस्तके प्रदर्शित केली होती. ललित वाङमयाचे वैशिष्ट्य म्हणजे ते केवळ मराठी व इंग्रजी भाषांपुरतेच मर्यादित नव्हते तर गुजराथी, हिंदी, तामिळ, मल्याळी, कानडी अशा निरनिराळ्या भाषांतून उपलब्ध होते. वाचक वाचनाच्या आवडीबरोबरच गायन, वादन आणि नृत्य ह्या कलांकडे आकर्षित व्हावेत या हेतूने संगीत कार्यालय, हाथरस यांनी गायन, वादन आणि नृत्य या विषयावरील निरनिराळ्या पुस्तकांचा परिचय करून दिला. प्राचीन भारतीय स्थापत्य, बौद्ध स्थापत्य आणि जैन स्थापत्य या कलांवरील उपयुक्त व मार्गदर्शक ग्रंथभांडार होते.

आजच्या संगणकाच्या युगात प्रत्येक व्यक्तीने स्वत:च्या व्यक्तिमत्त्वाची वेगळी छाप पाडण्याची गरज असते हा हेतू लक्षात घेऊन सेल्फ डेव्हलपमेंट पब्लिकेशनस्, मुंबई यांनी 'व्यक्तित्त्व' या शीर्षकाखाली व्यक्तिमत्त्व विकासावर निरनिराळी पुस्तके प्रदर्शित केली. यामधील बनराज मालवी यांच्या 'तुमची मानसिक शक्ती दहापटीने वाढवा' याचा आवर्जून उल्लेख करावासा वाटतो. मानसिक शक्तीबरोबरच अध्यात्माकडेही मानवाचा नैसर्गिक ओढा असल्याने याही विषयावरील अनेक धार्मिक ग्रंथ व हस्तलिखित प्राचीन दुर्लभ ग्रंथ आपले वैशिष्ट्य टिकवून होते.

A.I.T.B.S Pubilshers and Distributers, Delhi यांनी अर्थशास्त्रावरील पुस्तकाच्या जणूखजिन्याचे दालनच उघडले होते. John Tailor यांचे A Complete Text of Economics, R.G.D. Allen यांचे Mathematical Analysis for Economics, Peter H. Lindert यांचे International Economics, John P. Gould & Edward P. Lazear यांचे Micro Economic Theory आणि William H. Brovson यांचे Macro Economic Theory and Policy ही पुस्तके उपलब्ध होती.

India Book House यांनी प्रकाशित केलेली Random House Business Books, व्यापारी वर्गाचे आकर्षण बिंदू ठरले.

आजच्या माहितीच्या युगात संगणक हे अपरिहार्य आहेत. दररोज खुल्या होणाऱ्या नवनवीन माहितीच्या दालनांची ओळख करून देण्यासाठी PRENTICE-Hall of India Pvt. Ltd. यांनी निरनिराळी Microsoft Press Computer Books प्रकाशित केली.

केवळ माहित असलेल्या प्रकाशित पुसतकावरच अवलंबून रहाण्यापेक्षा ABI Overseas Ltd., Delhiयांनी

http: //www.books bank.com आणि www fpbaindia.org या वेबसाईटवर प्रकाशित होणाऱ्या पुस्तकांबद्दल माहिती मिळविण्याची सोय केलेली आहे.

वैद्यक विषयावर माहिती देणारे ग्रंथ आणि विविध कोश, मराठी तसेच इंग्रजीतून व त्याचबरोबर सरकारी प्रकाशनेही येथे उपलब्ध होती. भारतीय प्रकाशकांबरोबरच Hoddre Stoughton या परदेशी प्रकाशकाच्या पुस्तकांची रेलचेल होती. Imported चकचकीत पुस्तकांच्या ग्राहकांबरोबरच संगीता एजन्सीज्, मुंबई यांनी जुनी पुस्तकेही विक्रीसाठी ठेवली होती. हे ह्या प्रदर्शनाचे वेगळेपण जाणवले.

या प्रदर्शनात भारतातील निरनिराळ्या भागातल्या प्रकाशकांनी सहभाग घेतला होता, त्यांचा उल्लेख करावयाचा झाल्यास BPI India Pvt. Ltd., मुंबई, भारतीय विद्याभवन, नवी दिल्ली; BUTTERWORTH Heinaman, New Delhi, Chaukhamba Publications, Delhi, Himalaya Publishing House, Mumbai, केशव भिकाजी ढवळे, मुंबई, मॅजेस्टीकस् एजन्सीज्, मुंबई; मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे अशा मातब्बर प्रकाशकांनी आपल्या योगदानातून हे प्रदर्शन साकार केले.

खरोखरच या भव्य प्रदर्शनाने गतवर्षास - शतकास निरोप आणि नवीन सहस्रकांचे स्वागत ज्ञानार्जनाच्या अनमोल सेवेने केले आहे.

**नीता गुंडावार, रविन्द्र झनकर, अर्चना पुजारी**
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ,
विद्या प्रसारक मंडळाचे बांदोडकर विज्ञान महाविद्यालय,
केंद्र, ग्रंथपालन पदवी परीक्षा वर्ग, ठाणे ४०० ६०१.

* * *

## ज्ञानरूपी नंदनवनात

*मुलांचा कार्यक्रम म्हणजे
असतो तरी काय?
तो असते शिक्षकांचे प्रेम
जशी दुधावरची साय.*

*आपल्या कलेप्रमाणे आपली कला
सादर करतात ही मुले
गोड गोजिरी सुंदर हसरी
जशी बागेत डोलणारी फुले*

*ही नाजुक फुले अशीच
हसत बागडत रहावी,
भावी आयुष्य जीवनी,
जी शिक्षण सार्थी लावी.*

*या
या शाळेला मुख्याध्यापिका
मळेकर बाई लाभल्या
त्यांनी शिक्षणाबरोबर
कलेचे रोपटे लावले
आणि या शाळेचे नंदनवन झाले.*

*धन्य धन्य ही बेडेकर शाळा,
जी सर्वांना लाविते लळा.*

विकास ज्ञा. थोरात
(पालक)

# बहर ओसरला

> *नाशिक या तीर्थक्षेत्राचे पावित्र्य वाढविणारी दोन प्रतिभासंपन्न माणसे होती. कुसुमाग्रज व वसंत कानेटकर. वसंतरावांचे अलीकडेच निधन झाले. वसंत येण्यापूर्वीच वसंताचा बहर ओसरला... - संपादक*

वसंतराव कानेटकर हे मराठीतील श्रेष्ठ नाटककार म्हणून गेली ४० वर्षे जनतेसमोर आहेत. मराठी रंगदेवतेला त्यांनी उत्तमोत्तम नाटके अर्पण केली आहेत. या नाटकातील विविध विषय, त्यातून प्रकट झालेली त्यांची प्रतिभा अक्षरश: स्तिमित करणारी आहे. वेड्याचं घर उन्हात, प्रेमा तुझा रंग कसा?, अश्रूंची झाली फुले, रायगडाला जेव्हा जाग येते, इथे ओशाळला मृत्यू, प्रेमाच्या गावा जावे इ. त्यांची नाटके गाजली. 'हिमालयाची सावली' या नाटकाने तर कीर्तीचे अत्युच्च शिखर गाठले.

त्यांच्या संदर्भात कै. वि. वा शिरवाडकर म्हणाले होते, 'मराठी रंगभूमीला चैतन्य पुरविणारा आत्मा आमच्या नाशकातला. आणि या आत्म्याचं नाव वसंत कानेटकर. खरच, कृष्णाकाठी अवतरलेली कानेटकरांची प्रतिभा नाशिकला गोदातीरी ब्रह्मकमळासारखी प्रफुल्लित झाली याचा आम्हा नाशिककरांना अभिमान वाटतो'.

मराठी रंगभूमीच्या इतिहासावर ठसठशीतपणे एकच मुद्रा लखलखते ती म्हणजे कानेटकरांची. त्यांनी विविध विषयांवर नाट्यलेखन केले आहे. त्यांच्या नाट्यसंभारात धीरगंभीर शोकांतिकेपासून केवळ विनोदाच्या अंगाने फुलत जाणारी नाटके आहेत. ऐतिहासिक आहेत. सामाजिक व समस्याप्रधान नाटके आहेत. पौराणिक आहेत तशी चरित्रात्मकही आहेत. यातील काही नाटके कथानकाच्या, व्यक्तिचित्रणाच्या आणि वाङ्मयीन महत्तेच्या दृष्टीनं असाधारण उंचीवर जाणारी आहेत, त्यांनी या कालखंडाचा इतिहास घडवला आहे.

अशा नाटकात प्रामुख्याने त्यांच्या चरित्रात्मक आणि ऐतिहासिक नाटकांचा समावेश होतो. अनेक लहान मोठ्या व्यक्तींच्या जीवनविशेषांना त्यांनी नाट्यरूप दिले आहे. मानवी जीवनातील संघर्षाप्रमाणं आणि विद्रुपतेप्रमाणं त्यातील श्रेष्ठतेची आणि भद्रतेची त्यांना तीव्र जाण आहे.

नाटकातील शद्ब त्याचं प्राणतत्त्व आहे हे त्यांना पक्क ठाऊक होतं. त्यांच्या ऐतिहासिक नाटकांनी विशेषत: 'रायगडा'ने ऐतिहासिक नाट्यलेखनाचा एक नवा रस्ता निर्माण केला. ललित साहित्यातील ऐतिहासिक माणसं ही दगडी पुतळ्यासारखी असतात. त्यांना मोठेपणा असतो पण प्राण नसतो. या माणसांनाही सुखदु:खे असतात ही माणसेही सामान्य माणसांसारखीच असतात, ही कोंडी 'रायगडा'नं फोडली. मोठ्या माणसांनाही सामान्यांप्रमाणं सुखदु:खाच्या वेशीतून जावे लागते, सांसारिक माणसांप्रमाणे विविध ताणतणाव सहन करावे लागतात, हे समर्थपणाने दाखवले.

कानेटकरांना शिवकालाचे आकर्षण फार होते. अर्थात् त्यांचे प्रत्येक लेखन अभ्यासपूर्ण होते. 'आकाशमिठी' हे नाटक लिहिताना त्यांनी अस्सल कागदपत्र तपासून घेतली. अफझलखानाचा वध ही शिवाजी महाराजांच्या राजकीय कर्तृत्वाला कलाटणी देणारी घटना. या घटनेतील नाट्य व वास्तव तपासण्यासाठी त्यांनी कागदपत्रांचा आधार घेतला. या प्रयत्नात त्यांच्यातील मुरब्बी नाटककाराला खूप काही नवे आणि विस्मयकारक असे खाद्य सापडले. अफझलखानाचा वध ही एका फार

मोठ्या युद्धनीतीची आणि व्यूहरचनेची परिणती आहे त्यांच्या लक्षात आले. आणि शिवरायांनी जावळीच्या चंद्रराव मोरे यांची चंदरराई पादाक्रांत करण्याच्या घटनेपासून अफझलखानाच्या वधापर्यंतच्या घटनांची संगती त्यांना वेगळ्या प्रकारे लावणे शक्य झाले. मराठ्यांच्या इतिहासातील एका चित्तथरारक घटनेवरील नाटक वसंतरावांच्या लेखनकौशल्याची चुणुक दाखवते.

कानेटकरांच्या ऐतिहासिक नाटकांचे हे वैशिष्ट्यच होते की त्यांनी ऐतिहासिक साधनांचा कसून अभ्यास केला. 'रायगडाला' ...... प्रमाणेच 'इथे ओशाळला मृत्यू' या दोन्ही नाटकात या अभ्यासाचे संकेत जागोजाग दिसतात. 'जेथे गवतास भाले फुटतात' या नाटकातील औरंगजेबाचे पात्र उभे करण्यात त्यांची प्रतिभा प्रकर्षाने काम करते. यासाठी त्यांनी फारशी भाषेतील जे संदर्भ मिळाले ती सर्वच त्यांनी वाचून काढलेले दिसतात. त्यामुळे त्यांनी केलेले औरंगजेबाचे चित्रण इतिहास संशोधकांनाही कौतुकास्पद ठरावे.

माणसाच्या अंतरंगाचा शोध घेणारे वसंतराव नातेसंबंधांच्या वेगवेगळ्या छटा समर्थपणे चित्रित करत. पितापुत्राचे संबंध रेखाटताना, मग तो 'प्रेमा तुझा रंग कसा?' असो, रायगड असो, की 'हिमालयाची सावली' असो. त्यांच्या लेखणीला बहर येत असे. पण कानेटकरांच्या जाण्याने हा बहरही कोमेजला.. ओसरला. त्यांच्या नाट्यकृतीद्वारे ओदिकोलोनचा सुगंध मात्र दरवळत राहील.

वसंतरावांच्या स्मृतीला शतश: प्रणाम!

**सहसंपादक**

* * *

## मुखपृष्ठाविषयी थोडेसे

८ मार्च हा जागतिक महिला दिन म्हणून साजरा करण्यात येतो. ठिकठिकाणी महिलांच्या योग्यतेबद्दल, कर्तृत्वाबद्दल प्रसिद्धी माध्यमे भरपूर माहिती पुरवतात. जागोजागच्या स्त्री-कल्याण संघटना विविध उपक्रम, कार्यक्रम हाती घेतात. पण तरीही खरा प्रश्न पडतो तो असा की अशिक्षित अर्धशिक्षित, सुशिक्षित, उच्चशिक्षित स्त्रियांचे प्रश्न अजूनही का सुटलेले नाहीत?

एक जिवंत, हाडामासाची, वासनाविकारांनी युक्त असलेली आणि पुरुषांप्रमाणेच आपला आत्मगौरव जाणू बघणारी जाणीवसंपन्न व्यक्ती या नात्याने स्त्रीकडे सहसा पाहिले जात नाही. अध्यात्माच्या क्षेत्रात स्त्रीला जरी आदिमाया, आदिशक्ती असे संबोधलेले असले तरी प्रत्यक्षात मात्र एक उपभोग्य आणि उपयुक्त वस्तू म्हणूनच तिच्याकडे पाहिले जाते. वास्तविक स्त्री ही अशी व्यक्ती की जी रात्रंदिवस काम करते. सुटीसाठी तगादा न लावणारी, विश्वासू, सेवाभावी अशा अनेक गुणांनी संपन्न. सर्वात महत्वाचं म्हणजे नोकरी आणि घर सांभाळताना घरातील कामाबद्दलचा मोबदला न मागणारी.

अजूनही पुरुषाच्या खांद्याला खांदा लावून काम करणारी स्त्री, मग ती वरच्या हुद्यावर असली तरी दुय्यम मानली जाते. हे कुठेतरी थांबायला हवे. परिस्थिती बदलली पण सामाजिक दृष्टिकोन बदलायला हवा.

**मंजिरी दांडेकर**

# एकनाथांची भारूडे

*एकनाथ महाराजांची भारूडे आजही संभावित समाजाला बोध करणारी आहेत. या भारूडांमधील विचारांचा हा वेध. - संपादक*

प्राचीन मराठी संतवाङ्मयात आपल्या विविध स्वरूपी आणि विपुल रचनांची मोलाची भर टाकणारे संत एकनाथ हे एक थोर संत आणि कवी होते. त्यांची ग्रंथरचना (चतु:श्लोकी भागवत, एकनाथी भागवत, भावार्थ रामायण) स्फुटरचना, अभंग, गौळणी, भारूडे इ. वाङ्मयनिर्मिती मराठी वाङ्मयात मोलाची भर टाकणारी आहे. ज्ञान, विज्ञान, भक्ती-मुक्ती यासारख्या गूढ गहन संज्ञा त्यांनी अत्यंत सोप्या पद्धतीने आपल्या ग्रंथातून मांडल्या आहेत. नाथांच्या दृष्टीला जे जे पडले त्याचा त्यांनी आपल्या रचनांसाठी स्वीकार केला.



जनसामान्यांना 'डोळस' बनविण्याची, लौकिकाच्या माध्यमातून अलौकिकत्त्वाचा परिचय करून देण्याची आणि परमेश्वर भक्तीची गोडी लावण्याची नाथांची वृत्ती त्यांच्या भारूडासारख्या रचनांतून प्रत्ययास येते. नाथ हे लोकशिक्षक असल्यामुळे, समाजोद्धाराची तळमळ त्यांना असल्यामुळे जनसामान्यासाठी त्यांनी या रचना केल्या. अध्यात्म आणि काव्य, काव्य आणि नाट्य, उद्बोधन आणि रंजन, लौकिक आणि पारलौकिक, प्रपंच आणि परमार्थ, लोकवाङ्मय, लोककला अशा कितीतरी गोष्टी त्यांच्या भारूडात एकत्र आल्या. या गुणांमुळेच त्यांची भारूडे जनमानसात लोकप्रिय आणि भारूडे म्हटले की नाथांचीच असे समीकरण तयार झाले.

**प्रेरणा :-** नाथांच्या काळातील समाज अवनतीकडे प्रवास करीत होता. नाथांच्या संवेदनशील मनावर या समाजाचे चित्र परिणाम करीत होते. त्यांची संतवृत्ती व चिंतनशीलता त्यांना स्वस्थ बसू देत नव्हती. अवनतीकडे चाललेल्या समाजाला 'डोळस' करण्याची तळमळ त्यांच्या भारूडात दिसते. समाजातील अज्ञानी, खालच्या थरातील लोकांना परमेश्वर भक्तीची गोडी लागावी, अध्यात्माचे गूढ त्यांना कळावे व त्यातून त्यांचा उद्धार व्हावा या हेतूने त्यांना पचेल, रूचेल, आवडेल अशा माध्यमातून त्यांना ज्ञानी करण्याचा प्रयत्न नाथांनी भारूडातून केला.

**विषय :-** नाथांच्या भारूडांचे विश्व परमात्म्या-इतकेच व्यापक. देव-देवतांपासून ते समाजातील खालच्या थरातील व्यक्तीपर्यंत, तसेच प्राणी, पक्षी हे सुद्धा नाथांच्या भारूडाचे विषय झाले आहेत. संसारातील नित्याचे अनुभव, नित्योपयोगी वस्तू, मनोरंजनाची साधने, एवढेच नव्हे तर पत्रव्यवहाराचाही उपयोग अत्यंत कलात्मकतेने नाथांनी आपल्या भारूडांसाठी केला.

**आपले जीवन सुसंस्काराने आणि चांगल्या आचार विचारांनी घडवायचे म्हणजे ग्रंथालयाच्या सान्निध्यात किंवा ग्रंथाच्या सहवासात राहणे होय.**

**रूपके** - त्यांच्या भारूडाचे स्वरूप रूपकात्म आहे. त्यांनी रूपकाला भारूडात इतके महत्त्वाचे स्थान दिले की रूपक हा भारूडाचा आत्माच बनला. अध्यात्म आणि परमात्म विचार जनसामान्यांना कळण्यासाठी नाथांनी रूपकाचा आश्रय घेतलेला दिसतो. अध्यात्मिक तत्वावर आणि अनुभवावर लौकिक जीवनातील व्यक्तींची, घटना प्रसंगांची, अनुभवांची, वस्तूंची, खेळांची, पशु, पक्षी, प्राणी इ. लोकांच्या परिचित अनुभवांची रूपके नाथांनी आपल्या भारूडात केली. नाथांच्या रूपक योजकत्वाचे उत्तम उदाहरण म्हणून त्यांचे 'विंचू' हे भारूड पाहता येईल. मनुष्याच्या ठायी काम, क्रोध इ. विकार उद्भवले असता त्याची स्थिती काय होते याचे वर्णन नाथांनी विंचवाच्या दंशाच्या अनुभवातून या भारूडात केले आहे आणि त्यावरील उतारा म्हणजे परमेश्वर भक्ती असा उपायही त्यांनी सांगितला आहे. प्रपंचात अडकलेल्या जिवाला काम क्रोधांच्या नांग्या दंश करीत असतातच. त्यामुळे त्याच्या जिवाची तगमग होते. तेव्हा सत्वगुणाचा आश्रय करून परमेश्वर भक्तीतच विंचवाच्या दंशाचा उतारा आहे हे नाथांनी या भारूडातून व्यक्त केले आहे.

नाथांच्या व्यक्तिचित्रणात्मक भारूडातून व्यक्तिदर्शनाबरोबरच अध्यात्म तत्वांची अभिव्यक्ती होताना दिसते. त्यांचा 'आंधळा' आंधळा न राहता दिव्य दृष्टी देणारा बनतो, 'पांगळा' पारलौकिकाकडे धाव घेतो तर 'मुका' घडघड बोलू न लोकांना आश्चर्यचकित करतो आणि 'पिसा' शहाण्यासारखा वागतो. उदा. 'मुका' या भारूडाचे घेऊ. 'मुका' म्हणतो, 'मुका झालो वाचा गेली। होतो पंडित महाज्ञानी, दशग्रंथ षड्शास्त्रपुराणी, चारी वेद मुखोद्‌गत वाणी, गर्वामध्ये झाली सर्व हानी, जिव्हा लाचावली भोजना, दुग्ध धृत शर्करा पक्वान्ना साधु संतांची निंदा केली, हरिभक्तीची स्तुती नाही केली, तेणे वाचा पंगू झाली।' एरवी समाजात नेहमी वावरणारी व्यक्ती जेव्हा नाथांच्या भारूडातून व्यक्त होते तेव्हा तिला आगळेवेगळे रूप नाथांनी दिलेले पहावयास मिळते.

महालक्ष्मी, डाक, गोंधळ, जोगवा, फुलवारा, रोडगा इ. देवदेवतांवरही नाथांनी भारूडे रचली. यातील निर्गुण, निराकार आदिमायेवरील त्यांचे 'महालक्ष्मी भारूड' लक्षणीय आहे. त्यात महालक्ष्मीचे रूप गुण वर्णन करून नाथांनी या भारूडातून परमात्म्याचे रूप दाखवले ते असे- 'नवखंड पृथ्वी तुझी झोळी। सप्तपाताळी पाडले गेली। एकविस स्वर्ग मुकुटी झळाळी। बया दार उघड।'

समाजाच्या उद्धारासाठी आणि धर्माचरणाचा मार्ग मोकळा करण्यासाठी निर्गुणास आपले निराकार रूप झाकून निर्गुणद्वार लाव म्हणून नाथ विनवितात. नंतर दांभिक वृत्तीने माजलेला अनाचार दूर करण्यासाठी तिला 'दार उघड' असे म्हणतात.

नाथांचा आणखी एक विशेष म्हणजे 'दृष्टांत'. त्यामुळे भारूडातील मुख्य विचार तर स्पष्ट होतोच व त्याचबरोबर संबंधित घटनांचीही अधिक माहिती मिळते. अगदी लहान वाटणाऱ्या घटनेतही किती अर्थ भरला आहे हे त्यांच्या 'थट्टा' या भारूडात प्रत्ययास येते. नाथांच्या भारूडातील प्राणी जनसामान्यांशी सुसंवाद साधून अध्यात्मबोध करताना दिसतात. 'एडका' काम क्रोधाचे दुष्परिणाम सांगतो तर 'गाय' संतकृपा सद्‌गुरूसहवास यांचे महत्व सांगते. संत एकनाथांची भारूडे म्हणजे मराठी सारस्वताला मिळालेली अनमोल देणगी आहे.

शैला जोगळेकर
३/११, हेदवकर, वाडी नं. १,
गोखले रोड (साऊथ),
दादर, मुंबई - ४०० ०२८.

* * *

एखाद्याला वाचण्यापेक्षा लिहिण्याची जास्त आवड असते, परंतु निरनिराळ्या विषयांचे वाचन केल्या शिवाय लिहिता येणे कठीण असते.

# शब्दावाचून अडले सारे...

*‘शब्दांच्या पलीकडे’ जाऊ पाहणारे अजित कुलकर्णी आमच्या बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाचे विद्यार्थी. ‘शब्दकोडे’ या त्यांच्या सक्रिय अनुभवाबद्दल. - संपादक*

‘अद्वैत, वध शहाण्याला शब्दाचा मार’, अद्वैतला, माझ्या मुलाला (वय वर्षे ६) मी रागाने सांगत होतो. तो म्हणाला, ‘बाबा, शब्दाचा कधी मार असतो का?’ त्याच्या या प्रश्नाने माझा राग कुठल्या कुठे पळून गेला आणि शब्दांच्या सामर्थ्याची वीज माझ्या डोळ्यासमोरून कडाडून गेली.

साधारणत: तीन वर्षांपूर्वी मी शब्दांशी रोज खेळ रचत वाचकांचे मनोरंजन करीत असे. दैनिक सन्मित्रमध्ये अर्धवेळ वार्ताहर म्हणून काम करीत असताना सन्मित्रसाठी सुरुवातीला शब्दकोडे आणि नंतर महाशब्दकोडे तयार करण्याची संधी मिळाली. अर्थात् सन्मित्रचे श्री विजय जोशी यांनी शब्दकोडे बनविण्यासाठी मला प्रोत्साहन दिले आणि ज्येष्ठ संपादक व मातृभाषा मराठीचे प्रचारक मा.स.पां.जोशी यांच्या आशिर्वादाने मी शब्दकोडे बनविण्यास सुरुवात केली.

त्या वेळेस मुंबईच्या काही दुपारच्या वर्तमानपत्रांनी शब्दकोड्यांवर आपल्या खपांचे उच्चांक गाठले होते. तो शब्दकोड्यांचा काळ होता. (म्हणजे आजही आहे. परंतु त्यावेळेएवढे वेड नाही.) बहुतेक वाचकांच्या हाती शब्दकोड्याचे शेवटले पान असायचे. सुरुवातीला ९ गुणिले ९ चौकोनांचे लहान कोडे करण्याचे ठरले. श्री. विजय यांनी मला शब्दकोडे बनविण्याचे तंत्र कसे असते हे सांगितले. अजित कुलकर्णी शब्दसागराच्या लाटांवर स्वार होण्यास सिद्ध झाले.

‘शब्द शब्द जपून ठेव बकुळीच्या फुलांपरी’, शब्दाची शक्ती एखाद्या अण्वस्त्र शक्तीपेक्षाही भारी आहे याची प्रचीती येऊ लागली होती. ९ गुणिले ९ या शब्दकोड्याची जागा १८ गुणिले १८ या महाशब्दकोड्याने घेतली. तोपर्यंत मी तंत्र आत्मसात करून त्यात प्रावीण्य मिळविण्याच्या वाटेवर होतो. महाशब्दकोडे क्रमांक १ पासून मग शब्दांच्या दुनियेत वाटेल तसा स्वच्छंद फेरफटका होत होता. महाशब्दकोडे तयार करताना डोळ्यासमोर व्यावसायिक उद्दिष्ट होते. त्यामुळे कोड्यामध्ये वेगवेगळ्या तऱ्हेने वैविध्य आणण्याचा प्रयत्न करू लागलो होतो. शब्दकोड्यांची सुरुवात (म्हणजे १ आडवे व उभे)आकर्षक व चटकदार असेल यासाठी मराठी कविता, अभंग, नाट्यगीत, चित्रपट गीत यांचा आसरा घेतला तर कधी प्रसिद्ध नेते, अभिनेते, कलाकार यांचे सहाय्य घेतले.



महाशब्दकोड्याला काळाचे, जागेचे, राष्ट्राचे अथवा व्यक्तीचे कशाचेही बंधन ठेवले नाही. त्यामुळे स्थानिक अगदी नगरसेवकांपासून आंतरराष्ट्रीय व्यक्तिमत्त्वांना, घटनांना, कलाकृतींना, प्रसिद्ध उद्‌गारांना माझ्या शब्दकोड्यात अडकवू शकलो. वेळोवेळच्या दिन-विशेषानुसार टाकलेल्या पेचांमुळे वाचकांना महाशब्दकोडे

पदवीधर होऊन सुशिक्षित बनता येईल, परंतु सुसंस्कृत बनता येईल असे नाही.

सोडविताना मजा येत असे. महाशब्दकोडे सोपे बनविण्याचा अट्टाहास असल्याने महापालिकेत दैनिक सन्मित्रचे कोडे सोडविताना शिपायापासून नगरसेवकांना पाहिले की मन सुखावत असे.

हळूहळू महाशब्दकोड्यांची संख्या वाढत होती. शब्दकोडे बनविण्याच्या तंत्राला मी आत्मसात केलं होतं. अगोदर मी आठवड्यात एक दिवस बसून शब्दकोडे बनवून सन्मित्राला पाठवीत असे. ५ ते ६ महाशब्दकोडी बनविण्यासाठी मला आख्खा दिवस लागत असे. पण नंतर रोजच्या रोज मी शब्दकोडे बनवू लागलो. दररोज सकाळी साडेसहाला बसून सव्वासातपर्यंत माझे महाशब्दकोडे तयार व्हायचे. माझ्या या प्रगतीचे मलाच कधी कधी आश्चर्य वाटायचे, कारण जे कोडे सोडवायला किमान २० मिनिटे लागतात ते कोडे तयार करायला मला जास्तीत जास्त ४५ मिनिटे लागत होती. शब्दकोडे तयार करणे किंवा बनविणे हे शब्द जाऊन मग शब्दकोडे 'पाडणे' हा शब्द रूजू झाला. मग माझी आई किंवा घरातले गमतीने मला म्हणायचे, 'काय रे कोडे पाडलेस का?'

महाशब्दकोडे तयार करताना माझी आई ही माझी कडक टीकाकार होती. ती आणि तिची मैत्रिण पाटणकर काकू यांचा दररोज दुपारी सन्मित्रचे महाशब्दकोडे सोडविण्याचा 'निवांत' कार्यक्रम असायचा. सौ. पाटणकर काकू या तर माझ्या 'फॅन' बनल्या होत्या. काकूंनी माझ्या १ ते १००० महाशब्दकोड्यांपैकी किमान ९०० महाशब्दकोडी सोडविली आहेत. घरीच महाशब्दकोड्याचे 'पोस्टमार्टेम' होत असल्याने त्या दिवसाच्या महाशब्दकोड्याला कोणती व्याधी होती हे आई मला रात्री सांगत असे. त्यामुळे हळूहळू महाशब्दकोड्यातील तांत्रिक चुका, पुनरावृत्ती टाळता येऊ लागल्या. त्यात आमच्या विजुभाऊंनी खूप मार्गदर्शन केले.

'शब्दनाट्याचे हजार प्रयोग' एक हजाराव्या महाशब्दकोड्याच्या दैनिक सन्मित्रच्या विशेष आवृत्तीत माझ्या मित्राने लिहिलेल्या लेखाचे शीर्षक होते. एक हजार वेळा १८ गुणिले १८ चौकोनाच्या महाशब्दकोड्याद्वारे मी सन्मित्रच्या वाचकांना दररोज किमान १५ मिनिटे रिझवत होतो. त्यांना विरंगुळा मिळत होता. त्यांचे मनोरंजन होत होते. केवळ मनोरंजन या हेतूने सुरु केलेल्या उपक्रमाचे सातत्याने एक हजार प्रयोग व्हावेत ही गोष्ट सोपी नव्हती.

सन्मित्रच्या हजार शब्दकोड्याच्या विशेष अंकात सौ. पाटणकर काकूंनी आवर्जून लेख पाठविला. त्याच दिवशी धर्मवीर श्री. आनंद दिघे यांनी मला बोलाविणे पाठविले. वार्ताहराच्या निमित्ताने माझे त्यांचेकडे नियमित जाणेयेणे होतेच. परंतु खास माणूस पाठवून बोलावून घेतले. काहीतरी खास बातमी मिळेल या कल्पनेने मी त्यांचे कार्यालयात गेलो. तिकडे गेल्यावर त्यांनी मला विचारले 'हा शाम भारद्वाज कोण?' मी हसलो. कारण महाशब्दकोड्यावर लेखकाचे नाव म्हणून मी 'शाम भारद्वाज' हे टोपण नाव देत असे. टोपण नावामुळे सन्मित्रचे शब्दकोडे बनविणारा हा आपला अजित कुलकर्णी आहे याचे त्या दिवशी त्यांना कोडे सुटले व त्यांनी शाल व श्रीफळ देऊन छोटेखानी सत्कार केला. त्यावेळेस श्री. दिघे म्हणाले, 'एक हजार महाशब्दकोडे तयार करून तू सन्मित्रच्या वाचकांचे मनोरंजन तर केलेच आहेस परंतु मराठी मातृभाषेची सेवाही केली आहे'.

मातृभाषेचा सेवक असणाऱ्या अजित कुलकर्णी याने आता जीवनौघात वृत्तपत्र क्षेत्र सोडले आहे. आज शब्दांच्या सामर्थ्याची प्रचीती आल्यानंतर मोर्चा दुसरीकडे वळला आहे. सृष्टीत अशा अनेक गोष्टी आहेत की ज्या शब्दबद्ध करता येत नाही. शब्दांचे आण्विक शक्तीच्या तुलनेत असलेल्या सामर्थ्याचे जिथे काहीच चालत नाही अशा गोष्टींकडे आज ओढ लागली आहे.

'शब्दांच्या पलीकडे!'

**अजित अ. कुलकर्णी**
ठाणे (पूर्व)

• • •

जीवनात आपल्याला अनेक मित्र भेटतात, परंतु ग्रंथासारखे गुरुमित्र भेटणे कठीणचं.

# स्त्रीला काय हवं असतं? घर की करिअर?

> ८ मार्च! 'आंतरराष्ट्रीय महिला दिन'. त्या निमित्ताने अंतर्मुख करून विचारप्रवृत्त करेल असा हा लेख देत आहोत. - संपादक

घर-संसार की करिअर? असा प्रश्न प्रत्येक महत्त्वाकांक्षी स्त्रीपुढे येतो. साधारणपणे ९९ टक्के पुरुषांची आपल्या पत्नीनं घर सांभाळून मगच जमलं तर करिअर वगैरे करावं अशी अपेक्षा, नव्हे असा आग्रह असतो. बहुसंख्य स्त्रियांना देखील त्यात काही अन्यायकारक असं वाटत नाही. उलट करिअर करण्याच्या प्रयत्नात घराकडे जरादेखील दुर्लक्ष झालं तर तिला अपराध्यासारखं वाटतं. पती-पत्नी दोघंही कर्तबगार, करिअरिस्ट असले तर पतीच्या प्रगतीसाठी पत्नीनं करिअर सोडायचं हा तर जणू अलिखित संकेतच आहे.

मागे एकदा रेडिओवर प्रसिद्ध लेखिका शोभा डे यांची मुलाखत झाली होती. त्यात एके ठिकाणी त्या म्हणाल्या होत्या की, 'लेखन, करिअर वगैरे सगळं ठीक आहे. पण मला जर एकाची निवड करायची झाली असती तर घर-मुलं किंवा करिअर यापैकी मी निश्चितच घर आणि मुलांची निवड केली असती'. नुकताच ठाण्यात झालेल्या एका प्रकट मुलाखतीत एक प्रथितयश मराठी अभिनेत्री म्हणाली की, 'घर-संसार व्यवस्थित सांभाळूनच स्त्रीनं करिअर करायला हवं'. आता जर खुद्द करिअरिस्ट स्त्रियांची ही मनोवृत्तीअसेल तर मग बिनकरिअरवाल्या, सर्वसामान्य स्त्रियांना घर-संसार हेच आपलं अंतिम आणि एकमेव ध्येय आहे असं वाटलं तर त्यात नवल ते काय? त्यात काही गैर आहे असं मला म्हणायचं नाही. पण म्हणून सर्वच स्त्रियांनी घर-संसार केलाच पाहिजे हा समज, ही अपेक्षा गैर नाही का? एखाद्या स्त्रीनं पुरुषासारखं फक्त करिअर का करू नये? घरासाठी आपलं आयुष्य खर्च करायला स्त्रियांना नैसर्गिकरित्याच आवडतं असा एक धूर्त युक्तिवाद केला जातो. तो सर्वस्वी खोटा नाही पण स्त्रीच्या मनावर लहानपणापासून पद्धतशीरपणे बिंबवल्या गेलेल्या संस्कारामुळे तिला तसं वाटू लागतं हे ही तितकंच सत्य आहे. ज्या स्त्रीला घरापेक्षा करिअर महत्त्वाचं वाटतं तिच्या प्रत्येक शब्द आणि कृतीकडे सतत संशयाने पाहिलं जातं. तिच्यात नक्कीच काही तरी कमी आहे असं लोकांना वाटतं, नव्हे, तशी त्यांची खात्रीच असते. आजही आपल्या समाजात लग्न झालं म्हणजे मोक्ष मिळाला असंच समजलं जावं ह्याचं फार आश्चर्य आणि खेदही वाटतो. लग्न झालं की माणूस (मग ती स्त्री असो की पुरुष) मार्गाला लागतो हा सिद्धांत तर केवळ अफलातूनच. 'अरेरे! इतकी शिकली-सवरली, ऑफिसर झाली, पण अजूनही लग्न होत नाही बिचारीचं!' असा चिंतेचा घोर सर्वांना उगीचच लागून राहतो. तेव्हा लग्नाशिवाय मुलीच्या कर्तृत्त्वाला किंमत शून्य असाच अर्थ होतो. अभिनेत्री माधुरी दीक्षितचं लग्न होत नाही ह्याची तिच्या फॅन्सना आणि प्रसारमाध्यमांना कोण काळजी लागून राहिली होती. शेवटी एका मुलाखतीत ती वैतागून म्हणाली होती की, 'माझ्या लग्नाची माझ्या आई-वडीलांपेक्षा लोकांनाच जास्त काळजी वाटते'. पुढे गंमत अशी की तिचं (एकदाचं) लग्न झाल्यावर एका प्रसिद्ध मराठी वृत्तपत्राचे संपादक आपल्या संपादकीयात लिहिते झाले - 'तिनं (माधुरीनं) उशिरा का होईना लग्नबंधन स्वीकारलं. शेवटी चांगल्या घरातल्या सुसंस्कारी मुलीला शोभेल असंच ती वागली.' म्हणजे समजा तिनं लग्न केलंच नसतं तर तेवढ्यावरून ती असंस्कृत ठरली असती का? याच माधुरीने 'तेजाब' चित्रपटात 'एक दो तीन' सारखं बेफाम नृत्य केल्यावर प्रसारमाध्यमांनी, एक ब्राह्मणाची मुलगी असून असली भडक नृत्य ती करते यावरून तिच्यावर खूप टीका

केली होती. पुढे 'दयावान' चित्रपटात काही भडक दृश्ये केल्यावरही माधुरी दीक्षित विवादाच्या भोवऱ्यात सापडली होती. वास्तविक अशा 'धाडसी' भूमिका करून तिनं आपण किती 'प्रोफेशनल' आहोत हेच दाखवून दिलं असं लोक का नाही म्हणाले? (अर्थात पुढे ती नंबर वन होताच 'आपली माधुरी, मराठी माधुरी' असं सर्वांना वाटू लागलं ती गोष्ट अलहिदा!) पुरुष नाही का आपलं करिअर करताना कमी-अधिक प्रमाणात नाना उठाठेवी आणि तडजोडी करतात. कुणीही शंभर टक्के प्रामाणिक राहून यशस्वी होऊ शकतच नाही पण फक्त पुरुष करतो ती कर्तबगारी हा दुजाभाव का?

नुकताच एका उच्चपदस्थ महिलेने लिहिलेला एक लेख माझ्या वाचनात आला. त्यात तिनं तिला आलेल्या काही अनुभवांवरून असं लिहिलं होतं की बऱ्याचदा उच्चपदस्थ स्त्रिया आपलं स्त्रीपण विसरू शकत नाही. कामाच्या ठिकाणी वावरताना, जरा घरी अडचणी वगैरे आल्या की त्या आपलं शिक्षण, पद, अनुभव सर्व काही विसरून सामान्य स्त्रीप्रमाणे असहाय्य आणि भावनाशील बनतात आणि कार्यालयीन कार्यक्षमता, कर्तबगारी घालवून बसतात. ह्याचाच अर्थ की स्त्री कितीही शिकली, करिअरिस्ट झाली तरी तिची खरी भावनिक गुंतवणूक ही करिअरपेक्षा घरामध्येच जास्त असते. फक्त करिअर करायचं म्हणून प्रसंगी नवरा-मुलं-घर सोडण्याचं किंवा अविवाहित राहण्याचं धाडस (हो, धाडसच) एखादी करतेही, नाही असं नाही. पण सर्वसाधारणपणे खुद्द स्त्रियांनाच आपली खरी बांधिलकी करिअरपेक्षा घराशी आहे असं वाटतं, कारण तशीच तिला शिकवण मिळालेली असते.

माझ्या ओळखीची एक उच्चशिक्षित मुलगी एका ड्रग कंपनीत चांगल्या पगारावर कामाला होती. लवकरच तिला मॅनेजरची पोस्ट मिळणार होती. पण केवळ आपल्या लहान मुलीला सांभाळण्यासाठी कुणी नाही म्हणून तिने नोकरी सोडली. त्याची तिला फारशी खंतही वाटत नाही. मग प्रश्न पडतो की जर त्याग करण्यातच स्त्रीला खराखुरा मनापासून आनंद वाटत असेल तर मग त्याचा फायदा उठवत पुरुषानं स्वतःची प्रगती केली तर त्याला का दोष द्यायचा? मुळात तुम्ही स्वखुशीने निवड करता, घरात दुय्यम स्थान स्वीकारता, तर मग स्त्री-पुरुष समानता हवी अशी अपेक्षा का धरता? घर, मूल ही काही एखाद्या स्त्रीची जबाबदारी नसते. वरं करिअरवर पाणी सोडून घरी बसून संसार, संसार म्हणजे तरी काय करतात ह्या स्त्रिया? तर नवरा-मुलांची बडदास्त ठेवतात, घर सजवतात, टापटीप ठेवतात, झालंच तर नवऱ्याबरोबर पार्ट्यांना जाऊन तिथं 'शो-पीस' म्हणून स्वतःला मिरवून घेतात. पुढे मग नवरा आपल्या करिअरमध्ये गुरफटतो. मुले मोठी झाली की मग स्त्रीला आपल्याकडे दुर्लक्ष होतंय, आपल्या त्यागाची, प्रेमाची कुणाला कदरच नाही, अशी टोचणी लागते. वास्तविक याला जबाबदार ती स्वतःच असते. इतकी वर्षे मुलांची 'आई' नव्हे तर 'आया' म्हणूनच ती वावरलेली असते आणि नवऱ्याची सहचर, बनण्याऐवजी 'असिस्टंट' बनण्यात धन्यता मानत असते. मग ही स्त्री घरात आपलं मानाचं आणि स्वतंत्र असं स्थान निर्माण करू शकेल? खरी चैन असते पुरुषांची. ते घर-संसारात पडून देखील करिअर करायला मोकळे असतात. कारण घर वगैरे सांभाळायला पत्नी असतेच. अर्थात स्त्रियाही करिअर आणि घर ह्यांची सांगड घालू शकतात, नाही असे नाही. पण त्यासाठी त्यांना घरातून पाठिंबा आणि सहकार्य असेल तरच. म्हणजे स्त्रीनं करिअर करावं की घर सांभाळावं हे शेवटी पुरुषाच्या मर्जीवर ठरवलं जातं.

कुठल्याही समारंभात एखाद्या कर्तबगार, यशस्वी स्त्रीचा परिचय करून देताना ती उत्तम अधिकारी तर आहेच पण त्याचबरोबर ती एक आदर्श माता, आदर्श पत्नी किंवा उत्तम गृहिणी आहे हे ही आवर्जून सांगितले जाते. पुरुषाला मात्र तो एक यशस्वी उद्योगपती किंवा तत्सम कुणीतरी आहे एवढी ओळख पुरेशी असते. त्याच्यावर आदर्श पिता किंवा प्रेमळ पती असण्याचं बंधन नसतं.

मला वाटतं की स्त्रियांनी आता मानसिकदृष्ट्या अधिक कणखर बनून घर किंवा करिअर यापैकी एकाची निवड करण्याची वेळ आली आहे. आपल्यातल्या आईला, स्त्री-सुलभ भावनांना मुरड घालून करिअर हा पर्याय निवडला पाहिजे. करिअर करण्यासाठी घराबाहेरच पडावं लागतं असं नाही. जिजामातेनं आपल्या घरात (महालात) राहूनच शिवाजींसारखा पुरुषोत्तम आपल्या शिकवणीने, संस्कारांनी घडवला. ती ही एक कर्तबगारीच होती. पण तो काळ आणि आताचा काळ ह्यात फार मोठा फरक आहे. आजच्या स्त्रीला जिजामातेसारखं आदर्श माता बनवण्यासाठी अगोदर एक आदर्श व्यक्ती म्हणून जगायला शिकलं पाहिजे, घराच्या पलिकडेही आपलं कार्यक्षेत्र आहे, अस्तित्व आहे ह्याची खरीखुरी जाणीव व्हायला हवी.

कु. वर्षा गटणे
अ/३०२, विनायक सोसायटी,
मीठबंदर रोड, ठाणे (पूर्व) - ४०० ६०३.
दूरध्वनी क्र. ५३७ ३११८.

* * *

## किनारा

हवा होता मला
एक किनारा
नाजूक किनार असलेला
मायेच्या ओलाव्याचा
प्रीतीच्या पंखांचा आश्रय देणारा
की ज्यांत निद्राधीन व्हावं
उबदार स्पर्शांच्या पांघरूणातून
देहभान विसरून आधार देणारा
मन मोकळं करावयास लावणारा
समजून घेणारा,
अश्रुंच्या धारेत समावून घेणारा

विवेक आठल्ये, ठाणे.

(पान क्र. १३ वरून)

### गूढयात्री

याचे समाधानकारक उत्तर ती कादंबरी वाचकाला फारच थोड्या वेळा देऊ शकते. त्यात जर चरित्रात्मक कादंबरी एखाद्या साहित्यिकाची असेल तर पहिला आघात होतो त्या साहित्यिकाच्या भाषाशैलीवर. तसाच प्रकार 'गूढयात्री' मध्ये झाला आहे. शिवाय भरीला जी.ए. एक असे व्यक्तिमत्व होते की त्यांनी आपले आयुष्य फारच कमी प्रमाणात खुले केले. अशा व्यक्तिवर कादंबरी लिहिताना प्रचंड ताण पडणार हे सरळच आहे. इथेही तेच झाले आहे. वस्तुत: लेखिकेला कादंबरीचा पूर्वानुभव आहे. 'कृष्णमयी' ही त्यांची कादंबरी संत मीराबाईच्या जीवनावरील ऐतिहासिक कादंबरी प्रकाशित झाली आहे. इंदिरा गांधींच्या जीवनावर 'अर्घ्यदान' ही कादंबरी येत आहे. तरीही जी.एं.वरील कादंबरी समाधान करू शकत नाही हेच खरे.

प्रस्तावनेत त्यांनी अजंता येथील लेण्यातील बुद्धाच्या मूर्तीचे उदाहरण दिले आहे. 'बुद्धमूर्तीवर मधोमध प्रकाशझोत सोडला की बुद्धाची मुद्रा चिंतनमग्न दिसते, डावीकडून सोडला की विषण्ण भासते. पण तोच झोत उजवीकडून टाकला की बुद्धाच्या चर्येवर प्रसन्न स्मित विलसत आहेसं वाटतं.' बुद्धाविषयी जिव्हाळा बाळगणाऱ्या जी.एं.विषयी त्यांना तीन बाजू दिसतात. एक कथाकाराची, दुसरी तत्त्वचिंतकाची. दोन बाजू जगाला माहीत आहेत. म्हणून तिसरी बाजू प्रेमाची जी आहे ती बाजू या बाईंनी दाखवलेली आहे. पण इतकीच बाजू असती तर ती एका घटनेवर आधारित अशी एक कादंबरी झाली असती, पण तसे न होता इतर घटना आल्याने कादंबरी योग्य ती उंची गाठू शकत नाही असे म्हणावेसे वाटते.

प्रा. प्रदीप कर्णिक
ग्रंथपाल, रुपारेल महाविद्यालय, मुंबई

* * *

# परिसर वार्ता

विशाखा देशपांडे

## विद्या प्रसारक मंडळ

दि. २६ जानेवारी रोजी विद्या प्रसारक मंडळाच्या सर्व शैक्षणिक संस्थांनी एकत्रितपणे 'प्रजासत्ताक दिन' साजरा केला. तंत्रनिकेतनाच्या मागील बाजूस असलेल्या पटांगणावर हा सोहळा पार पडला. ठीक ८.०० वाजता मंडळाचे अध्यक्ष डॉ. वा. ना. बेडेकर यांच्या हस्ते झेंडावंदन झाले व त्यानंतर एन.सी.सी.च्या छात्रांनी पाहुण्यांना सलामी दिली.



डॉ. वा. ना. बेडेकर झेंडावंदन करताना.

मग अध्यक्ष डॉ. वा. ना. बेडेकर यांनी परेडचे निरीक्षण केले. यानंतर एन.सी.सी.च्या छात्रांना वार्षिक पारितोषिके देण्यात आली. या बक्षिस समारंभानंतर अध्यक्ष डॉ. बेडेकर यांनी आपल्या भाषणात सांगितले की, 'स्वातंत्र्य मिळवायचं असतं, ते मिळत नसतं. या स्वातंत्र्याची किंमत फार मोठी आहे. त्याची जपणूक करणे आवश्यक आहे. शेवटी एकावन्नाव्या प्रजासत्ताक दिनासाठी शुभेच्छा देऊन, 'हा दिवस आनंदाने साजरा करू' असा संदेश त्यांनी दिला. तंत्रनिकेतनाच्या विद्यार्थ्यांनी स्वागतगीत सादर केले.



डॉ. वा. ना. बेडेकर, एन.सी.सी. परेडचे निरीक्षण करताना.



डॉ. वा. ना. बेडेकर, छात्र सेनेला ढाल देताना

प्राथमिक शिक्षण पद्धतीबद्दल बोलताना, व्यवस्थापन वर्गाचा विद्यार्थी असलेले महेंद्र पांगारकर म्हणाले, 'आपली प्राथमिक शिक्षणपद्धती पाठांतरावर भर देणारी असून इथे इच्छा शिक्षणाचं स्वातंत्र्य नाही. विदेशी वस्तूंच्या सुळसुळाटामुळे आपणच आपल्या पायावर कुऱ्हाड मारून घेत आहोत. वाढत्या विदेशी कंपन्यांच्या प्रभावामुळे आपले उद्योगधंदे बंद पडत आहेत. आणि त्यामुळे बेरोजगारीचे प्रमाण कल्पनेपलिकडे वाढले आहे.

यानंतर सौ. ए. के. जोशी स्कूलच्या माध्यमिकच्या विद्यार्थिनींनी व बेडेकर विद्यामंदिराच्या पूर्व प्राथमिकच्या विद्यार्थ्यांनी 'ओथ डांस' व कवायतींची प्रात्यक्षिके सादर केली.





सौ. ए. के. जोशी स्कूलच्या माध्यमिकच्या विद्यार्थिनी व बेडेकर विद्यामंदिराच्या पूर्व प्राथमिकच्या विद्यार्थ्यांनी 'ओथ डांस' व कवायतींची प्रात्यक्षिके सादर करताना.

जोशी-बेडेकर महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी एक नाटक सादर केले ज्यामध्ये अजित करंदीकर, अमेय क्षीरसागर व मिनाली गायकवाड यांचा सहभाग होता. त्यानंतर बेडेकर विद्यामंदिराच्या प्रणव दांडेकर (४थी) याने राष्ट्रीय प्रतीकांची माहिती दिली व महत्त्व सांगितले. बांदोडकर कॉलेजच्या विद्यार्थी-विद्यार्थिनींनी, 'उधळीत शतकिरणा...' व 'हम सब भारतीय है...' ही देशभक्तीपर गीते अतिशय सुरेल स्वरात सादर केली. बेडेकर विद्यामंदिराच्या प्राथमिक विभागाने 'वेगवेगळी माती तरीही एकच आहे भूमी...' हे गीत सादर केले. जोशी-बेडेकर कॉलेजच्या मुलांनी 'अपनी आझादी को हम हरगीज मिटा सकते नही...' व 'जयोस्तुते...' ही गीते सादर केली. कार्यक्रमाची सांगता, बेडेकर विद्यामंदिराच्या माध्यमिक विभागाच्या विद्यार्थिनींनी 'वंदे मातरम्...' हे गीत नृत्यातून सादर करून केली.

**डॉ. बेडेकर विद्यामंदिर - (प्राथमिक विभाग)**

शाळेचे स्नेहसंमेलन झाल्यावर विद्यार्थ्यांना वेध लागतात ते सहलीचे. जानेवारी महिन्यात प्राथमिक विभागातील विद्यार्थ्यांच्या इयत्तानुसार वेगवेगळ्या ठिकाणी सहली जाऊन आल्या. बुधवार दि. ३-१-२००१ रोजी इयत्ता १ ली ची सहल 'रॉयल पार्क' येथे गेली होती. बुधवार दि. १०-१-२००१ रोजी इयत्ता ३ व ४ थी ची सहल शहापूर येथील 'नंदनवन' रिसॉर्ट येथे गेली होती. तसेच गुरुवार दि.११-१-२००१ रोजी इयत्ता २ री ची सहल 'टिकूजीनी वाडी', घोडबंदर येथे गेली होती. जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी सहलीला येऊन सहलीचा आनंद लुटला.

सोमवार, दि. ८ जानेवारी रोजी शैक्षणिक उपक्रम म्हणून प्राथमिक विभागातील सर्व विद्यार्थ्यांना अधिवेशनानुसार शाळेच्या वेळेतच 'स्लाईड शो' दाखविण्यात आला. शासनाने सन् २०००-२००१ ह्या शैक्षणिक वर्षात इयत्ता १ ली पासून इंग्रजी विषयाला सुरुवात केली आहे. ह्या वर्षी इ. १ ली चे 'My English Book - ONE' हे पुस्तक विद्यार्थ्यांना अभ्यासाला आहे. विद्यार्थ्यांना दाखविण्यात आलेल्या 'स्लाईड-शो' चा विषय देखिल 'My English Book - ONE' हा होता. वरील चलत्‌चित्राचा परिणाम, विद्यार्थ्यांच्या पाठ्यांश दृढीकरणासाठी चांगलाच उपयोगी ठरला.

प्राथमिक विभागातील विद्यार्थी शालेय अभ्यासक्रमाव्यतिरिक्त इतर उपक्रमातही सहभागी होतात. असेच आमचे काही यशस्वी विद्यार्थी पुढीलप्रमाणे -

✲ इयत्ता २ री ५ मध्ये असलेला कुमार - पार्थ विप्रदास महाजन यास सकाळतर्फे आयोजित राज्यस्तरीय बाल-चित्रकला स्पर्धेत द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले.

✲ शिवप्रेरणा मित्र मंडळ -कळवा, ठाणे आयोजित ठा.म.पा. पुरस्कृत भव्य बालचित्रकला स्पर्धा २००० घेण्यात आली. स्पर्धा दि. १०-१२-२००० रोजी कळवा येथे झाली. स्पर्धेत प्राथमिक विभागातील कुमार सात्विक प्रमोद पेणकर, इयत्ता ४ थी ५ या विद्यार्थ्यास प्रथम क्रमांकाचा पुरस्कार प्राप्त झाला.

✲ दि. २८-१-२००१ रोजी प्रियदर्शनी स्पोर्टस् कॉम्प्लेक्स् - मुलुंड येथे 'शरनम् ब्युडोकॉन -कराटे सेंटर' तर्फे आयोजित 'नॅशनल कराटे चॅम्पियनशिप' स्पर्धेत इयत्ता ४ थी तील विद्यार्थिनी कुमारी निकिता भोगले ही कांस्य पदकाची मानकरी ठरली.



कुमार हिमालय राजेंद्र शेलार (इ. ३ री ५)

✲ इयत्ता ३ री ५ मध्ये शिकत असलेला विद्यार्थी कुमार हिमालय राजेंद्र शेलार द्वारा 'दि यंगेस्ट कँडिडेट ऑफ द इयर २०००' हा पुरस्कार प्राप्त झाला. वरील पुरस्कार त्यास 'पुणे व्हेंचरर्स' ह्या संस्थेने 'बेसीक अॅडव्हेंचर कोर्स' यशस्वीपणे पूर्ण केल्याबद्दल दिला.

✲ इयत्ता ३ री ५ मधील विद्यार्थी कुमार अनिरुद्ध सुरेश ओक याने दि. २४-१२-२००० रोजी 'युथ हॉस्टेल्स असोसिएशन ऑफ इंडिया' या संस्थेच्या महाड शाखेने आयोजित केलेला 'रायगड प्रदक्षिणा' हा कार्यक्रम यशस्वीपणे पूर्ण केल

प्राथमिक विभागतील शिक्षिका सौ. रश्मी संदीप धर्माधिकारी ह्या एम्. ए. उत्तीर्ण झाल्या. एम्. ए. द्वितीय वर्षात मराठी हा त्यांचा विषय होता. सौ. वैदेही गांगल या शिक्षिका पी. ई. सोसायटीच्या २ रीच्या शिबीराच्या उद्घाटन समारंभासाठी गेल्या व त्यांनी मुलांना गाण्यातून उद्बोधन केले.

**तंत्र निकेतन**

**I.S.T.E. तर्फे आयोजित SAFETY FILM SHOW :**

'सुरक्षा' हा औद्योगिक क्षेत्रातील एक महत्त्वाचा घटक आहे. त्याची गरज व महत्त्व या संदर्भात तंत्रनिकेतनातील विद्यार्थ्यांमध्ये जागृकता निर्माण व्हावी यासाठी 'ISTE CHAPTER' ने या विषयावर एक सेमिनार व फिल्म शो आयोजित केला होता.

शुक्रवार दि. १९-१-२००१ रोजी 'औद्योगिक सुरक्षा' (Industrial Safety), याच विषयावर श्री. वी.वी. पाटील यांचे भाषण व फिल्म शो पार पडला. श्री. वी. वी. पाटील हे 'National Safety Council (N.S.C.)' मध्ये 'Asst. Director' या पदावर काम करत आहेत. ते या क्षेत्रात गेली १८ वर्षे काम करत आहेत. या कार्यक्रमाची सुरुवात कु. आरती गुरुनाथन् (Asst. Secretary ISTE Student Chapter) हीने प्रास्ताविक व पाहुण्यांची ओळख करून देऊन केली. श्री. पाटील यांच्या

भाषणातील प्रमुख मुद्दे :-

• 'सुरक्षा' म्हणजे काय? • औद्योगिक सुरक्षेचे महत्त्व
• 'अपघात' म्हणजे काय? • अपघाताची कारणे
• अपघाताचे प्रकार • अपघातानंतरच्या कृती
• सुरक्षिततेची अपघातातील भूमिका • सुरक्षिततेमुळे होणारे फायदे

हे सर्व मुद्दे त्यांनी विद्यार्थ्यांना सोप्या भाषेत व वेळप्रसंगी स्लाईड दाखवून समजावले. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये सुरक्षिततेच्या महत्त्वाची जाणीव निर्माण होण्यास मोठी मदत झाली.

यानंतरचा कार्यक्रम हा 'Safety Flim Show' चा होता. या कार्यक्रमात प्रमुख पाहुण्यांनी प्रोजेक्टरवर 'N.S.C.' मधून आणलेल्या तीन फिल्मस् दाखवल्या.

पहिल्या फिल्ममध्ये 'सुरक्षा' म्हणजे काय? अपघाताचे वेगवेगळे प्रकार, त्या संदर्भात उपाययोजना प्रसंगाधारे नमूद केल्या. दुसरी फिल्म ही उपकरणांच्या चुकीच्या हाताळणीमुळे होणाऱ्या अपघात व त्यानंतरच्या कृतीवर प्रकाश टाकणारी होती. या फिल्ममध्ये त्यांनी एका ट्रॉलीच्या अपघाताचे उदाहरण घेतले होते. यात त्यांनी अपघातानंतर प्राथमिक अहवाल सादर करावा, हा अपघात का झाला? त्यात चूक कोणाची हे शोधावे, असा अपघात परत घडू नये यासाठी काय करावे व त्याकरिता अस्तित्वात असलेले कायदे याचे सखोल मार्गदर्शन उदाहरणासहित केले. तिसऱ्या फिल्ममध्ये मानवी चुका व निष्काळजीपणा यामुळे घडणाऱ्या अपघाताचे उदाहरणासहित स्पष्टीकरण दिले. त्या टाळण्यासाठी काय करावे याचे समयोचित मार्गदर्शन पण केले.

अशा या माहितीपूर्ण कार्यक्रमाची सांगता श्री.अब्राहम सर ( Chem. Dept.) यांनी प्रमुख पाहुण्यांचे आभार मानून केली. यावेळी श्री. ओक सर (H.O.D. - Chem. Dept.) यांनी तंत्र-निकेतनातर्फे सप्रेम भेट दिली. याप्रसंगी स्वत: ओक सरांनी औद्योगिक सुरक्षेवर अनुभवाचे चार शब्द सांगितले.

या सर्व कार्यक्रमात सौ. इंगवले मॅडम ( Chem. Dept.), श्री. इंगोले सर (Chem. Dept.) यांनी सक्रिय सहभाग घेऊन हा कार्यक्रम आयोजित करण्यात फार मोलाचे सहकार्य केले. त्याचबरोबर 'ISTE STUDENT CHAPTER' च्या विद्यार्थी प्रतिनिधींनी सक्रिय सहभाग घेऊन हा कार्यक्रम यशस्वी करण्यात मोठा हातभार लावला.



आय. ए. एस. वर चर्चासत्रावेळी उपस्थित पाहुणे व वि. प्र. मं. चे पदाधिकारी

शनिवारी दि. १६ डिसेंबर २००० रोजी थोरले बाजीराव पेशवे सभागृहात Instrumentation च्या पदविका अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांसाठी एक चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. ह्या चर्चासत्रात आपल्या तंत्रनिकेन व इतर कॉलेजमधील जवळ जवळ २०० विद्यार्थी सहभागी झाले होते. कार्यक्रमाचे उद्घाटन विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. वा. ना. बेडेकर यांनी केली.

या कार्यक्रमात 'ISA' (International Society for Measurement & Control ) या विश्वविख्यात संस्थेबद्दल माहिती देण्यात आली. या सदस्यतेचा Instrumentation च्या विद्यार्थ्यांना कसा फायदा होईल हे सांगण्यात आले. तसेच विविध कंपन्यांमधील नवीन

व्यक्तींनी येऊन विद्यार्थ्यांना Instrumentation क्षेत्रातील नवीन तंत्रज्ञान आणि प्रगतिविषयी सांगितले.

सुपरटेक इन्स्ट्रूमेन्टेशन सर्व्हीसेस प्रा.लि. कंपनीचे डायरेक्टर श्री. सी. एस. लिमये यांनी Overview of Measurements & Control in Process Industries या विषयावर सर्व उपस्थितांना सहज समजू शकेल अशा प्रकारे माहिती दिली.

Encon चे श्री. वी. के. गोडबोले यांनी Emerging Trends & Opportunities for Instrumentation students याबद्दल माहिती देऊन विद्यार्थ्यांना भविष्यात कोणत्या नवनवीन संधी उपलब्ध आहेत हे सांगितले. तसेच ISA (International Society for Measurement & Control) चे कार्य काय आहे, या संस्थेच्या सभासदत्वाचा विद्यार्थ्यांना भविष्यात काय उपयोग होऊ शकतो, तसेच सभासदत्व मिळविण्याची अतिशय उपयुक्त अशी माहिती दिली.

Chemtex चे H.O.D. Instrumentation श्री.व्ही.पी. रमण यांनी SCADA, PLC & DCS - Overview, Selection & Application याबद्दल माहिती दिली.

या कार्यक्रमाचे पुढील आकर्षण म्हणजे सर्व विद्यार्थ्यांसाठी आयोजित केलेल्या प्रश्नोत्तराची खुली स्पर्धा. ही स्पर्धा सर्वश्रुत कार्यक्रम 'कौन बनेगा करोडपती' च्या धर्तीवर आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत एकूण दहा बक्षिसे देण्यात आली. ज्ञानवर्धन स्पर्धा, सहभोजन आणि भविष्याबद्दल अधिक आत्मविश्वास अशा विविध अनुभवांना एकत्र आणणारा दिवस उपस्थित असणाऱ्या प्रत्येकास काहीतरी भरीव असे देऊन गेला.

**इयत्ता १० वी - निरोप समारंभ**

दि. २५-१-२००१ रोजी सौ. आनंदीबाई केशव जोशी इंग्रजी माध्यम शाळेचा इयत्ता १० वी निरोप समारंभ पार पडला. इयत्ता ९ वी तील विद्यार्थी अजिंक्य काळे याने प्रास्ताविक करून सूत्रसंचालनाला सुरुवात केली. त्यानंतर 'गणराज गजानन यावा हो' या ६ वी व ७ वी तील विद्यार्थ्यांनी म्हटलेल्या सुरेल प्रार्थनेने विघ्नहर्त्या गणेशाला आवाहन करण्यात आले.

शाळेच्या पर्यवेक्षिका सौ. तेजस्विनी तेलंग यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. ज्ञानसाधना महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. जी. बी. विशे हे प्रमुख पाहुणे म्हणून लाभले होते.

यश मिळवण्यासाठी कोणताही शॉर्टकट नसून परिश्रमानेच यश मिळवले पाहिजे असे सौ. तेलंग यांनी विद्यार्थ्यांना सांगितले.



**निरोप समारंभात भाषण करताना इयत्ता १० वी ची विद्यार्थिनी कु. मानसी बापट**

इयत्ता १० वी तील विद्यार्थिनी मानसी बापट हिने इंग्रजीतून केलेल्या आपल्या भाषणात शाळेने संपूर्ण व्यक्तिमत्त्व विकासासाठी प्रयत्न केले असे सांगितले. तसेच मुलगी सासरी गेली तरी पालकांना, घरच्या संस्कारांना विसरत नाही तसेच आम्ही शाळा सोडली तरी शिक्षकांना

व शाळेने केलेल्या संस्कारांना विसरणार नाही असेही सांगितले.

प्रसाद लाड याने संस्कृतमधून केलेल्या भाषणात सर्वांगीण उन्नतीसाठी गुरुजनांनी दिलेल्या प्रोत्साहनाचा उल्लेख केला. शाळेच्या उन्नतीसाठी कायम झटेन असे सांगितले. शाळेतील शिक्षिका सौ. उल्का कुलकर्णी यांनी हिंदीतून केलेल्या आपल्या भाषणात विद्यार्थ्यांना सांगितले की चांगल्या कामाने विष सुद्धा अमृतात बदलते. उन्नतीसाठी मूल्यांचा बळी चढवण्याची गरज नाही.

शीतल हळदवणेकर , मधुरा कुलकर्णी , प्रफुल्ल निसार व इसायतानन ह्या सर्व विद्यार्थ्यांनी आपले विचार प्रगट केले.



**निरोप समारंभात मार्गदर्शन करताना श्री. जी. वी. विशे, विद्याप्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. वा. ना. बेडेकर, कार्याध्यक्ष श्री. अ. धों. टिल्लू व इंग्रजी माध्यमाच्या प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका कु. वि लींडा डिसोजा**

प्रमुख पाहुणे डॉ. विशे यांनी विद्यार्थ्यांना मोलाचा उपदेश केला. मोठी आव्हाने पेलण्यासाठी इच्छाशक्ती, प्रयत्न व निश्चय यांची गरज आहे. माहिती तंत्रज्ञान, बायोटेक्नॉलॉजी, मनोरंजन व्यवसाय यांचे महत्व सांगितले. मोठे होताना केवळ पैशाच्या रूपात नाही तर विचारांच्या, यशाच्या रूपात शाळेला काही तरी द्या असे सांगून परीक्षेसंबंधी सूचना दिल्या.

विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. वा. ना. बेडेकर यांनी मुंबई बोर्डात पहिला आलेला शाळेचा विद्यार्थी नचिकेत थोरात याच्या इतिहासाची पुनरावृत्ती करताना १००% निकाल हे शाळेचं खरं यश असे सांगितले.

इयत्ता ९ वी विद्यार्थिनी सुप्रिया दळवी हिच्या आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाचा समारोप झाला.

## बांदोडकर विज्ञान महाविद्यालय

ठाणे जिल्ह्यातील आदिवासी बालकांच्या कुपोषण समस्येवर गेले एक दशक संशोधन करीत असलेले बांदोडकर महाविद्यालयातील वनस्पतिशास्त्राचे प्राध्यापक डॉ. नागेश शं. टेकाळे हे ११ फेब्रुवारीस हॅनोई, व्हिएतनाम येथे 'जीवनसत्व 'अ' व कुपोषण' या विषयावरील आंतरराष्ट्रीय चर्चासत्रात भाग घेण्यासाठी आमंत्रित म्हणून रवाना झाले. हे चर्चासत्र १२ ते १६ फेब्रुवारीपर्यंत झाले. यामध्ये जागतिक आरोग्य संघटनेच्या तज्ज्ञांसह (WHO) इतर अनेक राष्ट्रांतील आहारतज्ज्ञ भाग घेतला.



**श्री. उदय निरगुडकरांचे स्वागत करताना प्राचार्य सी.जी. पाटील**

**पारितोषिक वितरण**

एकीकडे अर्धशिक्षित, निरक्षर जग तर दुसरीकडे सुशिक्षित बेकारांच्या नव्या प्रशिक्षणाची गरज, एका बाजूला विभिन्न सांस्कृतिक औद्योगिक वातावरण तर दुसऱ्या बाजूला स्वत:च्या आयडेंटीटीचा, अस्तित्वाचा जीवघेणा संघर्ष अशी प्रचंड मोठी आव्हाने यापुढील काळात शिक्षण संस्थांना पेलावी लागणार आहेत असे उद्‌गार उदय निरगुडकर यांनी अलिकडेच महाविद्यालय परिसरात थोरले बाजीराव पेशवे सभागृहात बोलताना काढले.

बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या वार्षिक पारितोषिक वितरण समारंभात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी डॉ. वा. ना. बेडेकर हे होते.



शं. नां नवरे यांचे स्वागत करताना डॉ. वा. ना. बेडेकर

समारंभाची सुरुवात कु. दर्शना या विद्यार्थिनीने सादर केलेल्या ईशस्तवनाने झाली. तिला हार्मोनियमवर सम्रक थरवळ व तबल्यावर श्रीरंग यांनी साथ दिली. महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी व 'ॲपटेक' या माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील नामवंत संस्थेचे उपाध्यक्ष असणारे उदय निरगुडकर यांचा प्रा. सौ. मीरा अकोलकर यांनी परिचय करून दिला. गुजराथ मधील भूकंपात मृत्यू झालेल्या बांधवांना श्रद्धांजली वाहण्यासाठी दोन मिनिटे सभागृहात स्तब्धता पाळली.

महाविद्यालयाचे प्राचार्य सी. जी. पाटील यांनी २०००-२००१ या शैक्षणिक वर्षाचा अहवाल सादर केला. प्रा. सौ. सुधा फाटक व प्रा. व्ही.एम्. फेगडे यांनी पारितोषिकप्राप्त विद्यार्थ्यांची नावे वाचली. गतवर्षी झालेल्या बी.एस.सी. च्या पदवी परीक्षेत मुंबई विद्यापीठातून सर्वप्रथम आलेल्या प्राजक्ता सारंगने सर्वाधिक पारितोषिके मिळवली.

विद्याप्रसारक मंडळाचे व समारंभाचे अध्यक्ष डॉ. वा. ना. बेडेकर यांच्या अध्यक्षीय भाषणाने कार्यक्रमाची सांगता झाली. कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. मकरंद दीक्षित यांनी आभार मानले. डॉ. वि. दा. मांजरेकर यांनी सूत्रसंचालन केले.

**डॉ. बेडेकर विद्यामंदिर (मा. वि.)**

❊ 'वर्ल्ड फुनाकोशी शोटोकॉन कराटे ऑर्गनायझेशन' या संस्थेतर्फे ११ वी ऑल इंडिया चॅंपियनशीप स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत प्राजक्ता चंद्रराव काळे (५ अ) या विद्यार्थिनीला 'कातास' या प्रकारात सुवर्णपदक व 'फ्रायटिंग' या प्रकारात कांस्य पदक प्राप्त झाले.

❊ दि. ३ फेब्रु. २००१ या दिवशी 'पारिजातक' प्रकाशन व शुभेच्छा समारंभ आयोजित करण्यात आला. या शुभेच्छा समारंभासाठी प्रमुख पाहुणे होते श्रेष्ठ साहित्यिक श्री. शं. ना. नवरे. विद्यार्थ्यांना शुभेच्छा देताना ते म्हणाले, 'माणसापासून दूर जाऊ नका. माणसामाणसातील संबंध दोऱ्यासारखे असावेत. जसजसे जवळ याल तसतसे दोऱ्यासारखे गुंतत जा. गुंतणे चांगले. माणसांवर प्रेम करा.

• • •

# जीवनाचा आनंद

*डॉ. बेडेकर विद्यामंदिरातील इ. १० वी च्या शुभेच्छा समारंभप्रसंगी कु. मीनल पाटील, हिने आपले विचार पुढील काव्यातून व्यक्त केले. - संपादक*

जीवनाचा खरा आनंद
साथ मैत्रीची, ओढ गप्पांची, थट्टा मस्करीची
घड्याळाचे काटे सरकतात, वेळ निघून जातो
बालपणीचे क्षण, ते फुलपाखराप्रमाणे बागडणे
फूल म्हणून जीवनाचा आनंद लुटला ते क्षण
स्मरणात ठेवण्यासारखा जीवनाचा खरा आनंद
तो आनंद वाटायचा असतो, दुःख लपवायचे असते
नाते जुळवले तर तोडायचे नसते
(वर्तमानाचे भान ठेवत) काळाबरोबर जायचे असते.
गोड आठवणी स्मरणात ठेवायच्या, कटु तेवढेच
विसरायचे
आठवणींना उजाळा द्यायला, विसरलेले आठवायला
गेलेल्यांना बोलवायला, जाणाऱ्यांना अडवायला
मागेपुढे पहायचे नसते
यायचे असेल ते येणार, जायचे असेल ते जाणार
पण काहीतरी मिळवायला, कोठेतरी प्रयत्न हवे
स्वप्न बघायची असतात, मनातल्या भिंतीवर
रंगवायची असतात
पण स्वप्न तुटल्यावर कधी मने दुखवायची नसतात
विनोद असतात, मारामारी असते.
शाळा असते म्हणूनच ज्ञान असते
शाळा नसती, मित्र नसते, मैत्रिणीही नसत्या
जीवनाचा खरा आनंद नसता तर नंतरच्या काळात
आठवायला आठवणीही नसत्या।
काहीतरी करायचे असते, मोठे बनून दाखवायचे असते
ज्ञान हे मिळवायचे असते, म्हणूनच शाळेत यायचे
असते
कला असतात, प्रयोग असतात
वेळोवेळी खेळायला तासही कमी पडतात
नाद असतो, गाणी असतात
पण त्या जीवनात कधी खोटेपणा नसतो
शिक्षक रागावतात, आपले भले करतात
त्यांचे ऐकले नाही तर पुढचे क्षण चुकायचे असतात
जिद्द असते, आकांक्षा असते, राग असतो, प्रेम असते
पण या रागात कधी रुसायचे नसते
रुसले की संपले क्षणार्धात गेले
शाळेचा निरोप घेताना शेवटच्या क्षणीही
रडायचे नसते
अश्रू डोळ्यात आले तरी डोळे बंद करायचे असतात
शेवटच्या क्षणीही हसायचे असते
जीवनाचा आनंद लुटलेला असतो
मैत्रीत त्या हळुवारपणे, भावस्पर्शी मनातून
नात्यांच्या ती सीमेतून, बंधनाच्या क्षणातून
रेशमाच्या गाठीतून, आठवणींच्या साठ्यातून
अलगदपणे त्या सर्वांचा हात सोडायचा असतो
शेवटची भेट असते, जन्माची गाठ असते
काही झाले तरी विसरायचे नसते
तसेच तुमचे आमचे नाते असते
क्षण हा संपला वाटा हजारो लागल्या
कुठेही जायचे असले तरी भावना या जपायच्या
शाळेला निरोप दिला तरी
अभ्यासाला निरोप देऊ नका
आठवणींना आठवून एका कोपऱ्यात बसून
हळूच अश्रू गाळायचे नसतात
रडले तरी चिडवायचे नसते
डोळ्यातले भाव जाणायचे असतात
काहीही झाले तरी बालपणीच्या आठवणीच त्या
कधीही न विसरता एकदा तरी आठवायच्या
असतात आठवणी मनाच्या एका कोपऱ्यात
दाबून धरायच्या असतात
उद्याचा त्याचा प्रश्न, उद्याची त्याची मैत्री
खरी वाट सापडली तर पुन्हा भेटायची इच्छा जपायची
शाळेच्या बाहेर पडताना कॉलेजचे विश्व रंगवायचे
शाळेचा निरोप असाच घ्यायचा असतो
शाळेला न विसरण्यासाठी

**कु. मीनल शांताराम पाटील**
डॉ. बेडेकर विद्यामंदिर, ठाणे

✲ ✲ ✲